## पंतप्रधान मोदींना इंडोनेशियाचा सर्वोच्च नागरी सन्मान



**जाकार्ता :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडच्या दौऱ्यावर आहेत. २०१८नंतरची त्यांची ही पहिलीच द्विपक्षीय भेट आहे. पंतप्रधान मोदींना मंगळवारी (दि.७) इंडोनेशियाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'बिनतांग आदिपूर्णा' देण्यात आला. दोन्ही देशांच्या संबंधांना दृढ करण्यासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकारासाठी हा पुरस्कार असून तो प्रदान करत असताना इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांनी पंतप्रधान मोदींनी तोंडभरून कौतुक केले. दरम्यान, भारतीय पंतप्रधानांच्या सन्मानार्थ खास स्नेहभोजनाचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्राध्यक्ष प्रबोवो म्हणाले, मी पंतप्रधान मोदी यांच्यासमोर हे मान्य करतो की, मी तुमच्या कारकिर्दीची नक्कल करतो. तुमच्या अनेक योजना मी अमलात आणल्या आहेत आणि हे सांगताना मला अजिबात संकोच वाटत नाही.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३५०
www.ramprahar.com

◆ बुधवार, ८ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


रायगडात अतिवृष्टीमुळे 'महावितरण'चे नुकसान/२

अतिदुर्मीळ अल्बिनो चंचू वाळा सापाचे दर्शन/५

स्पेनचा पोर्तुगालवर विजय; रोनाल्डोचे स्वप्न अधुरेच!/८


### १ ऑगस्टपासून ॲप आधारित बाईक-टॅक्सींसाठी नवीन परवाने

# राज्य सरकार आणणार धोरण

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात अनधिकृतपणे सुरू असलेल्या ॲप आधारित बाईक-टॅक्सी सेवांना कायदेशीर चौकटीत आणण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. १ ऑगस्टपासून ॲप आधारित बाईक-टॅक्सींसाठी नवीन परवाने जारी करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी (दि.७) विधानसभेत केली.

सध्या राज्यात सुमारे ४ ते ४.५ लाख ॲप-आधारित बाईक-टॅक्सी कोणत्याही वैध परवान्याशिवाय सुरू आहेत. या सेवांमधून शासनाला कोणताही महसूल मिळत नसल्यामुळे त्यांना नियमनाच्या कक्षेत आणण्यासाठी नवीन धोरण तयार करण्यात आले आहे.




नवीन धोरणानुसार बाईक-टॅक्सीचा परवाना फक्त महाराष्ट्राचा रहिवासी दाखला असलेल्या युवकांनाच दिला जाणार आहे. यासाठी आवश्यक बॅच, वैध वाहनचालक परवाना आणि शासनाने निश्चित केलेल्या इतर पात्रता अटी पूर्ण करणे बंधनकारक आहे. या निर्णयामुळे राज्यातील स्थानिक युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. प्रत्येक बाईक-टॅक्सी चालकाकडून दररोज पाच रुपये शुल्क आकारले जाणार असून प्रत्येक प्रवासाच्या भाड्याच्या दोन टक्के रक्कम शासनाकडे शुल्क म्हणून जमा करावी लागेल. यामुळे सरकारी महसुलात वाढ होईल.

### महिला, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेवर भर

नवीन व्यवस्थेनुसार महिला आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत तसेच बाईक-टॅक्सी चालकांना शासनाने निर्धारित केलेल्या सुरक्षा नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल. बाईक-टॅक्सीचा कमाल वेग ताशी २५ किलोमीटर इतका निश्चित करण्यात आला आहे.

## पोलादपूरच्या नाणेघोळमध्ये जमिनीला भेगा

**पोलादपूर : प्रतिनिधी**



पोलादपूर तालुक्यातील नाणेघोळ गावाजवळ असलेल्या डोंगरावर साधारणपणे अर्धा किलोमीटर अंतरापेक्षा अधिक जमिनीला अर्धा ते एक फूट रूंदीच्या भेगा पडल्या आहेत. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सुरक्षिततेचा उपाय म्हणून स्थलांतरित करण्यात आल्याची माहिती आपत्ती निवारण व्यवस्थापनाचे प्रमुख व तहसीलदार कपिल घोरपडे यांनी दिली.

### प्रशासनाने ग्रामस्थांना केले स्थलांतरित

आपत्ती निवारण कक्षाच्या शासकीय समितीने घटनास्थळी जाऊन पाहणी केली. या समितीमध्ये नायब तहसीलदार सानप, जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागाचे शाखा अभियंता कांबळे, विस्तार अधिकारी हंबीर, ग्रामपंचायत अधिकारी त्रिशिला गंभीरे, तलाठी जाधव, पुरवठा अधिकारी आबा जगताप, मंडळ अधिकारी मंगेश पवार तसेच पोलीस कर्मचारी यांचा समावेश होता.

पोलादपूर तालुक्यातील संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या यादीमध्ये नाणेघोळ गावाचा समावेश काही वर्षांपूर्वी झालेल्या भूस्खलन व अतिवृष्टीच्या घटनेनंतर करण्यात आला आहे. याआधीही येथील पाच घरांची हानी झाली असल्याने यावेळी हे गाव नैसर्गिक आपत्तीग्रस्त ठरवून ग्रामस्थांना सुरक्षितस्थळी घरकुलांसह सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शासनाकडे देण्यात येईल, असे तहसीलदार कपिल घोरपडे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

## बेफाम कारची पादचारी, वाहनांना धडक

### तळोजातील घटना : एकाचा मृत्यू, पाच जण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील तळोजात मंगळवारी (दि.७) दुपारी एका कारचालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने भीषण अपघात झाला. बेफाम कारने पादचारी आणि वाहनांना जोरदार धडक दिली. यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला असून पाच जण जखमी झाले आहेत.



तळोजा फेज १मध्ये दुपारी १२च्या सुमारास भरधाव वेगाने आलेल्या इलेक्ट्रिक कारने (एमएच ४६ डीए ४८१४) रस्त्यावरील नागरिकांना तसेच वाहनांना धडक दिली. या अपघातात नदीम खान यांचा जागीच मृत्यू झाला, तर जखमींमध्ये शराफुद्दीन शाकिर अली (४३), रामदुलारे रामसहाय गुप्ता (३७), सनी महेंद्र निषाद (३३), विघ्नेश संतोष पानसरे (१७) व मोहम्मद गुलफराज एमडी नसीम शेख (२८) यांचा समावेश आहे. जखमींवर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघातानंतर कारचालक पळून गेला असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्याचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

## माथेरानमध्ये वादळी पावसाने वीज, इंटरनेट बंद

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानला मागील पाच दिवसांपासून मुसळधार पावसाने झोडपून काढले असून वादळसदृश वाऱ्यामुळे वीजपुरवठा बंद होऊन इंटरनेट सेवाही कोलमडली आहे. त्यातच मोबाइलला नेटवर्क नसल्याने स्थानिक नागरिकांबरोबरच पर्यटकांनाही संपर्क करणे अवघड झाले आहे.

माथेरानमध्ये जोरदार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे पडली आहेत. विद्युत आणि इंटरनेटच्या तारांवर पडलेल्या झाडांच्या फांद्यांमुळे वीजपुरवठा खंडित झाला आहे. याचसोबत मोबाइला पुरेसे नेटवर्क नसल्याने येथे एकमेकांसोबत संपर्क करणेही कठीण झाले आहे. सद्यस्थितीत माथेरानमध्ये पर्यटक बऱ्यापैकी असल्याने त्यांना ऑनलाइन पेमेंट कसे करावे, असा प्रश्न पडला आहे. हॉटेलमध्येही वीजपुरवठा नसल्याने काही हॉटेलधारकांनी बुकिंग रद्द केल्या आहेत.

## पनवेल महापालिकेच्या विकास प्रकल्पांचे सादरीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध महत्त्वपूर्ण विकास प्रकल्पांचे सादरीकरण सोमवारी (दि.६) बैठकीत करण्यात आले. यावेळी महापालिकेचे नवीन मुख्यालय, कळंबोली येथील फिश व मटण मार्केट प्रकल्प तसेच शिलार प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती सादर करण्यात आली.



या आढावा बैठकीला महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, आयुक्त मंगेश चितळे उपस्थित होते. उपस्थित लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी प्रकल्पाच्या तांत्रिक, व्यावहारिक बाजू समजून घेत कामाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला.

या बैठकीस सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक मनोज भुजबळ, सुमित झुंजारराव, दशरथ म्हात्रे, विकास घरत, नगरसेविका अस्मिता घरत, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

## निवडक

### वायनाडमध्ये दरड कोसळून तीन कामगारांचा मृत्यू

**वायनाड :** केरळमधील वायनाडमध्ये मंगळवारी (दि.७) बोगद्याचे काम सुरू असताना दरड कोसळली. यामध्ये तीन कामगारांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर घटनास्थळी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले असून अजूनही अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, जखमी झालेल्या पाच जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### नाशिकवरील ढगफुटीचे संकट टळले, पाऊस कायम

**नाशिक :** नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरावर घोंगावणारे ढगफुटीसदृश पावसाचे मोठे संकट तूर्तास टळले आहे. हवामान विभागाने नाशिक, त्र्यंबकेश्वर परिसरात मंगळवार (दि.७)साठी पावसाचा हाय अलर्ट जारी केला होता, मात्र वाऱ्याची दिशा बदलल्यामुळे हे धोकादायक ढग आता अहिल्यानगर आणि गुजरातच्या सुरत शहराच्या दिशेने पुढे सरकले आहेत, पण परिसरात पावसाचा जोर कायम होता.

### पनवेल तालुक्याला पावसाचा फटका

## चार जणांचा मृत्यू, ४५ घरांचे नुकसान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून पडलेल्या मुसळधार पावसामुळे विविध दुर्घटनांमध्ये चार जणांचा मृत्यू झाला आहे तसेच अंदाजे ४५ घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर महसूल विभाग, पोलीस, अग्निशमन दल, ग्रामविकास विभाग आणि पनवेल महानगरपालिका यांनी संयुक्तपणे मदत व बचावकार्य राबवले.

आपटा येथील प्रज्वल प्रदीप कांबळे (१५) हा मुलगा ५ जुलैपासून बेपत्ता होता. त्याचा मृतदेह उरण तालुक्यात आढळून आला. दिघाटी येथील मच्छिंद्र गणपत गावंड (४०) हे पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले होते. त्यांना शोधून वशेणी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषित केले. वाघाचीवाडी परिसरात सुमित यशवंत पवार (२२) आणि नयन राम म्हात्रे (२३) हे दोघे पाण्यात वाहून गेले होते. बचाव पथकाने सुमितला बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले, तर नयनचा मृतदेह मंगळवारी (दि.७) गाढेश्वर धरणात आढळून आला आहे.

प्राथमिक माहितीनुसार तालुक्यातील सुमारे ४५ घरांचे अंशतः नुकसान झाले असून संबंधित पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे आणि निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार यांनी पूरग्रस्त व संभाव्य धोकादायक भागांची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले असून संबंधित यंत्रणांना सतर्क राहून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## धबधब्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जतच्या वांगणी परिसरातील बेडीस गावाजवळ असलेल्या भागीरथी धबधब्यात बुडून २३ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला आहे. ओमकार संतोषकुमार साहू (२३, रा. घाटकोपर, मुंबई) असे मयत तरुणाचे नाव असून दोन दिवसांच्या अथक शोधमोहिमेनंतर त्याचा मृतदेह सापडला.

ओमकार साहू रविवारी तीन मित्रांसह भागीरथी धबधबा परिसरात आला होता. प्रचंड प्रवाहात तो बुडाला. प्रतिकूल हवामानामुळे दिवसभर प्रयत्न करूनही त्याचा शोध लागू शकला नाही. सोमवारी पुन्हा शोधकार्य सुरू करण्यात आले. अखेर सायंकाळी ६.३०च्या सुमारास ओमकारचा मृतदेह शोधण्यात पोलीस, रेस्क्यू पथक आणि स्थानिक नागरिकांना यश आले. याबाबत पुढील प्रक्रिया व तपास सुरू आहे.

## कर्जत-लोणावळादरम्यानची रेल्वेसेवा दुसऱ्या दिवशीही बंद

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे लोहमार्गावर बोरघाटात मोठ्या प्रमाणात दगडगोटे आणि माती वाहून आल्याने कर्जत ते लोणावळा रेल्वेसेवा मंगळवारी (दि.७) सलग दुसऱ्या दिवशी बंद ठेवण्यात आली. या मार्गावरील सर्व प्रवासी रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.



मुसळधार पावसामुळे बोरघाटातील खंडाळा, मंकी हिल ते नागनाथ मंदिर ठाकूरवाडी या ठिकाणी रेल्वे ट्रॅकवर दगड आणि माती वाहून आली. त्यामुळे मुंबई आणि पुणे अशा दोन्हीकडे चालणाऱ्या रेल्वेगाड्या बंद ठेवण्यात आल्या. दरम्यान, रेल्वे प्रशासनाकडून ट्रॅकवरील मलबा हटवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे.

**दोन मृतदेह आढळले**

दरम्यान, मुंबई-पुणे लोहमार्गावरील बोरघाटात दोन मृतदेह आढळले आहेत. आधी सोमवारी जांबरुंग केबीन परिसरात अनोळखी महिलेचे शव सापडले. खोपोलीचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे व हेल्प फाउंडेशन टीमच्या पथकाने भरपावसात घटनास्थळी दाखल होत खोल दरीतून रस्सीच्या साह्याने ते बाहेर काढले आणि कर्जत लोहमार्ग पोलिसांच्या ताब्यात दिले. ही घटना ताजी असतानाच मंगळवारी पुन्हा बोरघाटात लोहमार्गावर अनोळखी पुरुषाचे शव असल्याची खबर खोपोली पोलिसांना मिळाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हेल्प फाउंडेशनच्या पथकाने मंकी हिलपासून पुढे दाखल होत ते शव शोधले.

## पनवेल मनपा स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मंगळवारी (दि. ७) मनपा मुख्यालयात स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी विविध विषयांना मंजुरी देण्यात आली.



या बैठकीस स्थायी समितीचे सर्व सदस्य, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त रवीकिरण घोडके, स्वरूप खारगे, अभिषेक पराडकर, शहर अभियंता राजेश कर्डिले, सचिव नानासाहेब कामठे, उपसचिव अक्षय कदम आदी उपस्थित होते.

यावेळी महापालिका हद्दीतील प्रभाग समिती ब, प्रभाग क्र. १५, सेक्टर ८, भूखंड क्र.१४, खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथे माता रमाबाई आंबेडकर सांस्कृतिक भवन उभारणे या कामाच्या सकारात्मक व नकारात्मकला मान्यता मिळणेबाबतचा विषय स्थायी समितीने स्थगित केला. महापालिकेच्या सल्लागाराची पाच वर्षांकरिता (प्रथम तीन वर्षे व समाधानकारक पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षे मुदतवाढ) निवडसुचीचा विस्तार करण्याचा विषय स्थगित करण्यात आला.

प्रभाग समिती अ, खारघरमधील सेक्टर १८ येथील नाल्याचे सुशोभीकरण व विकास करण्याचा विषय स्थायी समितीने मंजूर केला. महापालिका मालकीच्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शाळा क्र. ८, पोदी शाळेची दुरूस्ती करण्याचा विषय एकमताने सर्वांनी मंजूर केला. प्रभाग समिती ब, सेक्टर ७, भूखंड क्र. जी-१, नवीन पनवेल (पूर्व) येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम करणे या कामाच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळण्याबाबतचा विषय स्थगित करण्यात आला.

प्रभाग समिती क, मोठा खांदा गावातील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे व पूर्वनिर्मित पावसाळी गटार बांधण्याचा विषय मंजूर करण्यात आला. लायन्स गार्डन ते पीडब्ल्यूडी ऑफिस ते जुने कोर्ट ते बंदर नाका (प्लॉट नं. ५०/३३ ते प्लॉट नं. ३४,३६/१,५२०)पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामाच्या कमी व अधिक सकारात्मक आणि नकारात्मक तफावत (अतिरिक्त/बचत)ला मान्यता मिळण्याबाबतच्या विषयाला मंजुरी दिली गेली.

प्रभाग समिती ब व ड येथील रस्त्यांचे डांबरीकरण व इतर अनुषंगिक कामे करणे या कामाच्या सकारात्मक व नकारात्मकला मान्यता मिळण्याबाबतचा विषय स्थायी समितीने स्थगित केला. खारघर से. १०, प्लॉट नं. २५१वर सामाजिक सभागृह बांधणे या कामाच्या परिणाम बदलास मान्यता मिळण्याबाबत समितीने मंजुरी दिली. कळंबोली से. ५, भूखंड क्र ११अ, क्षेत्र ११९५.५८ चौमी येथे मच्छी मार्केट उभारण्याच्या विषयास मान्यता देण्यात आली.

प्रभाग समिती क व ड क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी दोन वर्षांकरिता विद्युत उपकरणे व विद्युत व्यवस्था भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली. **(पान २ वर..)**

### अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरण

## गुजरात हायकोर्टाकडून ३८ दहशतवाद्यांची फाशी कायम

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

२००८च्या अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोटप्रकरणी मंगळवारी (दि.७) गुजरात उच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचा निर्णय सुनावला. विशेष न्यायालयाच्या आदेशावर शिक्कामोर्तब करत हायकोर्टाने ३८ दहशतवाद्यांची फाशी आणि ११ जणांची जन्मठेप कायम ठेवली आहे.

अहमदाबाद येथे २६ जुलै २००८ रोजी केवळ ७० मिनिटांत एकापाठोपाठ एक असे २१ बॉम्बस्फोट झाले होते. या घटनेच्या १४ वर्षांनंतर अर्थात २०२२मध्ये सत्र न्यायालयाने ३८ दहशतवाद्यांना फाशी आणि ११ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. न्यायालयाने हे प्रकरण दुर्मिळातील दुर्मीळ असल्याचे म्हटले होते. एकाच प्रकरणात एवढ्या मोठ्या संख्येने आरोपींना फाशीची शिक्षा सुनावण्याची ही पहिलीच वेळ होती.



याविरोधात दोषींनी उच्च न्यायालयात अपील केले, तर राज्य सरकारनेही त्यांच्या फाशीच्या शिक्षेला मंजुरी देण्यासाठी याचिका दाखल केली होती.

विशेष न्यायालयाच्या आदेशावर शिक्कामोर्तब करत हायकोर्टाने ३८ दहशतवाद्यांची फाशी आणि ११ जणांची जन्मठेप कायम ठेवली. त्याचप्रमाणे स्फोटांमध्ये मरण पावलेल्या एकूण ५६ जणांच्या नातलगांना प्रत्येकी १० लाख रुपये, तर २००हून अधिक जखमींना प्रत्येकी एक लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेशही दिले आहेत.

# महाडमधील जनजीवन हळूहळू पूर्वपदावर

## महाड–पुणे बससेवा मात्र बंदच

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहर व तालुक्यामध्ये गेली तीन दिवस कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे पूर परिस्थिती निर्माण झाली होती. तसेच ग्रामीण भागात जाणारे मार्ग व मुंबई गोवा महामार्ग बाधित झाल्याने सर्व वाहतूक पूर्णतः बंद झाली होती. सोशल मीडियावर महाड जगापासून तुटल्याच्या चर्चांना उधाण आले होते. प्रशासकीय यंत्रणेने युद्धपातळीवरती काम करीत बहुतांश मार्गांवरील दरडी व पडलेली झाडे दूर करून वाहतूक पूर्वपदावरती आणली आहे. यासाठी जवळपास एक हजार आसपास मनुष्यबळ कार्यरत होते.

१ जुलैपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे महाड शहरात व तालुक्यामध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. गेल्या तीन दिवसांमध्ये मुसळधार पाऊस कोसळल्याने सावित्री, गांधारी, काळ या नद्या धोक्याच्या पातळीवरती वाहू लागल्याने त्यांचे पुराचे पाणी महाड शहरासह आजूबाजूच्या गावांमध्ये शिरले होते. त्यामुळे सर्व जनजीवन विस्कळीत झाले होते. या तीन दिवसांमध्ये जवळपास ८०० मिलिमीटर एवढा पाऊस पडला आहे, तर दिनांक ५ जुलै या एकाच दिवशी जवळपास ५०० मिलिमीटर एवढा पाऊस कोसळला आहे.



महाड शहरामध्ये पुराचे पाणी शिरल्याने महाड शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र शासनाकडून योग्य ती खबरदारी घेतल्याने महाड शहरांमध्ये व परिसरात कुठल्या प्रकारची मोठी दुर्घटना घडली नाही. मात्र टेमघर व कांबळे तर्फे बिरवाडी येथे दोघांचा या पाण्यामुळे मृत्यू झाले. महाडचे आमदार व मंत्री भरत गोगावले हे स्वतः जातीने या पूर्वस्थिती वर लक्ष देऊन होते. पावसाचे प्रमाण हळूहळू कमी झाल्याने पुराचे पाणी देखील ओसरु लागले आहे. ज्या दुकानांमध्ये पुराचे पाणी शिरले होते ते दुकानदार आपली दुकाने साफसफाई करून सामान लावण्याच्या कामात व्यस्त झाली आहेत. तर महसूल यंत्रणेच्या मार्फत नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे केले जात आहेत.

या पुरामुळे किती नुकसान झाले याचा अचूक आकडा जरी उपलब्ध झाला नसला तरी, या पुर परस्थितीत महाडमध्ये करोडची हानी होत असते. मात्र गेल्या काही वर्षापासून सावित्री मधील गाळ काढल्याने सावित्रीचा चॅनल मोकळा झाला असून, पुराचे पाणी महाड शहरांमध्ये शिरण्याचे प्रमाण देखील कमी झाले आहे. त्यामुळे महाड शहराचा संभाव्य पुराचा धोका आता तरी टाळला आहे. महाड तालुक्यात निर्माण झालेल्या या अतिवृष्टी व पूर परिस्थितीमध्ये विविध ठिकाणी दरडी, झाडे कोसळण्याचे प्रकार घडले असून बऱ्याच ठिकाणी पुराचे पाणी पुलावरती आल्याने वाहतूक देखील बंद झाली होती.

महाड महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी पोपटराव उमासे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार महेश शितोळे, पोलीस निरीक्षक, नगरपालिका सीओ, पंचायत समिती गट विकास अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, विज वितरण असे अनेक अधिकारी कार्यरत होते. या सर्व ठिकाणी नगरपालिकेचे १०० कर्मचारी, महसूल विभागाचे १२५, पोलीस, विजवितरण, साबा विभाग, एनडीआरएफ, आरोग्य विभाग व स्थानिक बचाव पथकासह शासनाच्या इतर विभागामार्फत जवळपास हजार कर्मचारी कार्यरत राहून या युध्दपातळीवर कार्य करीत या संकटातून मार्ग काढला आहे.

राज्य परिवहन महामंडळाचे महाड डिपो मॅनेजर रितेश फुलसुंदर हे देखील स्वतः सर्व व्यवस्थावरती लक्ष ठेवून होते. पुरपरस्थिती निर्माण झाल्याने महाडमधील सर्व बस सुरक्षित स्थळी ठेवण्यात आल्या होत्या.

# रायगडात अतिवृष्टीमुळे 'महावितरण'चे मोठे नुकसान

**पेण : रामप्रहर वृत्त**

दोन–तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने रायगड जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत केले असून महावितरणच्या पेण मंडळातील वीज वितरण व्यवस्थेलाही मोठा फटका बसला आहे. अतिवृष्टी, पूरस्थिती, नद्यांना आलेला पूर आणि अनेक ठिकाणी पाण्याखाली गेलेल्या वीज यंत्रणेमुळे सुमारे १ लाख २५ हजार वीज ग्राहकांचा वीजपुरवठा बाधित झाला होता, मात्र या अभूतपूर्व संकटातही महावितरणचे अभियंते, अधिकारी व कर्मचारी, जीवाची पर्वा न करता युद्धपातळीवर काम करून वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी अहोरात्र झटत आहेत.

अतिवृष्टीमुळे पेण मंडळात १११ उच्चदाब वीजवाहिनीचे खांब, १९५ लघुदाब वीजवाहिनीचे खांब, ४१ रोहित्रे नादुरुस्त झाली असून १०.२० किलोमीटर उच्चदाब व २४.९६ किलोमीटर लघुदाब वीजवाहिन्यांवरील तारा तुटल्या आहेत. या नुकसानीची एकूण अंदाजित किंमत रु.२१०.३५ लाख (सुमारे रु.२.१० कोटी) इतकी आहे. पेण मंडळात एकूण ७ लाख ४७ हजार वीजग्राहक असून त्यापैकी १ लाख २५ हजार वीज ग्राहकांचा वीजपुरवठा बाधित झाला होता. महावितरणच्या तातडीच्या प्रयत्नांमुळे आतापर्यंत सुमारे ६० हजार ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात यश आले आहे. उर्वरित भागांमध्ये अनेक ठिकाणी वीज यंत्रणा अद्यापही पाण्याखाली असून, काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने दुरुस्तीची कामे सुरू आहेत.



पाणी ओसरताच उर्वरित ग्राहकांचा वीजपुरवठा शक्य तितक्या लवकर सुरू करण्यासाठी सर्व यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे. पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता, धनराज बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली पेण मंडळातील सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचारी विविध पथकांच्या माध्यमातून युद्धपातळीवर काम करत आहेत. अनेक ठिकाणी प्रकाशदूत कमरेपर्यंत, तर काही ठिकाणी छातीपर्यंत पाण्यात उतरून तुटलेल्या वीजवाहिन्या, रोहित्रे, डीपी संरचना आणि खांब दुरुस्त करत आहेत. मुसळधार पाऊस, वेगवान पाण्याचा प्रवाह आणि अत्यंत प्रतिकूल हवामानाची तमा न बाळगता ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत.

ग्राहकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत पूरग्रस्त आणि सखल भागांतील वीजपुरवठा अनेक ठिकाणी खबरदारीचा उपाय म्हणून तात्पुरता बंद ठेवण्यात आला होता. पाणी ओसरल्यानंतर आणि वीज यंत्रणेची सुरक्षितता तपासून खात्री झाल्यानंतरच त्या भागांतील वीजपुरवठा पुन्हा सुरू करण्यात येत आहे. दरम्यान, पाली येथील अंबा नदीच्या वाढलेल्या पाण्याच्या पातळीमुळे एनडीआरएफच्या पथकाने दुरुस्तीच्या कामाला परवानगी दिली नव्हती.

# पुराच्या विळख्यातून दोन नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलांची सुखरूप सुटका

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पेण तालुक्यातील रावे आणि तांबडशेत या गावांना पुराच्या पाण्याने वेढा दिलेला असताना प्रसूतीची वेळ जवळ आलेल्या दोन नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलांची जिल्हा प्रशासनाच्या तत्परतेमुळे आणि प्रशिक्षित 'आपदा मित्रां'च्या धाडसी प्रयत्नांमुळे सुखरूप सुटका करण्यात आली. पुराच्या पाण्याचा वेग, गावांना पडलेला पाण्याचा वेढा आणि मार्गाचा अंदाज घेण्यातील मोठी जोखीम अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपदा मित्र अभिकेत म्हात्रे आणि राजेश म्हात्रे यांनी लागोपाठ दोन बचाव मोहिमा यशस्वी केल्या. दोन्ही गर्भवती महिलांना सुरक्षितपणे बाहेर काढून वेळेत वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या आरोग्य समितीचे सभापती वैकुंठ पाटील यांनी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदेश शिर्के यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून रावे, ता. पेण येथील पायल राजेश पाटील (वय २३) या नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलेला प्रसूतीसाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता असल्याची माहिती दिली.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शिर्के यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे यांना ही माहिती दिली. आणि तातडीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांना तातडीने बचाव पथक पाठविण्याच्या सूचना दिल्या.

मात्र, रावे गावाला पुराच्या पाण्याचा पूर्णपणे वेढा पडला होता. गावापर्यंत पोहोचण्यासाठी कोणताही पर्यायी मार्ग उपलब्ध नव्हता. त्यामुळे बोटीच्या माध्यमातूनच बचावकार्य करणे आवश्यक होते. पुराच्या पाण्याला मोठा वेग होता. तसेच पाण्याच्या वाढलेल्या पातळीमुळे मासेमारीची बोट घटनास्थळापर्यंत नेणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीत बचाव मोहीम राबविणे अत्यंत जोखमीचे होते.



जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक आणि पेणचे उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांनी तातडीने समन्वय साधून शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या रबर बोटीचा वापर करण्याचा निर्णय घेतला. पुराच्या पाण्याचा वेग आणि मार्गाचा अचूक अंदाज घेणे कठीण असतानाही आपत्ती व्यवस्थापनाचे विशेष प्रशिक्षण घेतलेले आपदा मित्र अभिकेत म्हात्रे यांनी धाडसाने पुढाकार घेतला. त्यांना आपदा मित्र राजेश म्हात्रे यांनी साथ दिली.

दोन्ही आपदा मित्रांनी आपल्या प्रशिक्षणाचा आणि कौशल्याचा प्रभावी वापर करून रबर बोट पुराच्या पाण्यातून सुरक्षितपणे रावे गावातील गर्भवती महिला असलेल्या ठिकाणापर्यंत नेली. त्यानंतर अत्यंत काळजीपूर्वक बचावकार्य राबवत पायल राजेश पाटील यांच्यासह त्यांच्यासोबत असलेल्या अन्य चार जणांना रबर बोटीतून सुरक्षितपणे किनाऱ्यावर आणण्यात आले. बचाव पथक किनाऱ्यावर पोहोचण्यापूर्वीच प्रशासनाने रुग्णवाहिका सज्ज ठेवली होती. त्यामुळे कोणताही वेळ न दवडता पायल राजेश पाटील यांना तातडीने पेण येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

पहिली मोहीम पूर्ण होते न होते तोच दुसरा मदतीचा कॉल रावे येथील अत्यंत जोखमीचे बचावकार्य पूर्ण होते न होते, तोच प्रशासनाला तांबडशेत गावातून आणखी एक तातडीचा मदतीचा संदेश प्राप्त झाला. तांबडशेत गावातही एक नऊ महिन्यांची गर्भवती महिला पुराच्या पाण्यात अडकली होती. तिलाही तातडीने सुरक्षितस्थळी आणून वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देणे आवश्यक होते.

पहिल्या मोहिमेतील आव्हाने आणि जोखीम यांना सामोरे गेल्यानंतरही क्षणाचाही विलंब न करता आपदा मित्र अभिकेत म्हात्रे आणि राजेश म्हात्रे पुन्हा दुसऱ्या बचाव मोहिमेसाठी सज्ज झाले. प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या समन्वयातून त्यांनी तांबडशेत गावाकडे धाव घेतली. पुराच्या पाण्यातून मार्ग काढत या दोन्ही आपदा मित्रांनी दुसरी बचाव मोहीमही यशस्वीपणे पूर्ण केली. तांबडशेत येथील नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलेलाही सुरक्षितपणे पुराच्या विळख्यातून बाहेर काढण्यात आले आणि तिला आवश्यक वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात आले.

एकामागोमाग एक अशा दोन अत्यंत जोखमीच्या बचाव मोहिमा यशस्वी करून आपदा मित्र अभिकेत म्हात्रे आणि राजेश म्हात्रे यांनी प्रसंगावधान, धाडस, प्रशिक्षण आणि सेवाभावाचा आदर्श घालून दिला. या दोन्ही नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलांना वेळेत सुरक्षितस्थळी आणून वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात आल्याने माता आणि त्यांच्या गर्भातील बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे बचावकार्य अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले.

जिल्हा प्रशासनाची तत्परता, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचा प्रभावी समन्वय, रुग्णवाहिकेची सज्जता आणि आपदा मित्रांचे धाडस यामुळे दोन गर्भवती महिलांना वेळेत मदत मिळू शकली. जीवाची जोखीम पत्करून राबविण्यात आलेल्या या बचाव मोहिमेबद्दल रावे आणि तांबडशेत परिसरातील नागरिकांनी शासन, जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि धाडसी आपदा मित्रांचे आभार मानले आहेत.

# तब्बल ३५ तासांनंतर अष्टमी शहरातील पाणी ओसरले; ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

**रोहा : प्रतिनिधी**

कुंडलिका नदीला पूर आल्यानंतर अष्टमी शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरले होते. तब्बल ३५ तास अष्टमी पुराच्या पाण्याच्या विळखात होते.पहाटेपासून पाणी ओसरायला सुरुवात झाल्यानंतर नागरिकांनी घरातली साफसफाई करण्यास सुरुवात केली आहे.शहरातील घरात, दुकानात नागरिकांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. गेली दोन दिवस वीज नाही, मोबाईल नेटवर्क नाही, खाण्यापिण्याच्या समस्या होत्या.घरात जनावर येण्याची भीती वाटत होती. अशातच गेली दोन दिवस अष्टमीकरांनी जागत दिवस काढल्याचे दिसून येते.



नगरपालिकेकडून त्यांना मदतीचा हात दिला जात होता. खाण्याची व्यवस्था करण्यात येत होती. अष्टमी शहरातील आलेल्या पुरामुळे झालेले नुकसानाचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी अष्टमी ग्रामस्थ करीत आहे.

कुंडलिका नदीला गेली दोन दिवस मोठ्या प्रमाणात पूर आले होता. त्यामुळे कुंडलिका नदीवर असलेल्या अष्टमी पुलावरून पाणी जात होते. आता पुलावरील पाणी ओसरले आहे. परंतु पुलाच्या दोन्ही बाजूचे काही ठिकाणी कटडे पाण्याच्या ओघामुळे तुटल्याचे दिसून येते. झाडे झुडपे पुलावर आल्याचे दिसून येत आहे.पाणी ओसरले असले तरी जुन्या पुलावरून वाहतूक सध्या बंद आहे. अजूनही पुलाला पाणी लागल्याचे दृश्य आपल्याला पाहावयास मिळते. त्यामुळे खबरदारी उपाय म्हणून अद्यापही वाहतुकीस खुला केला नाही. पुलावरील साफसफाई नगरपरिषदेच्यावतीने करण्यात येत आहे.खंडीत झालेली वीज पुर्ववत झाली आहे. वहातुक ही सुरुळीत होताना दिसत आहे.कामगारांना ही दिलासा मिळाल्याने ते कामावर जाताना दिसत आहेत.शाळेला मात्र खबरदारीचा उपाय म्हणून सुट्टी देण्यात आली आहे.

# रायगडात एक लाख ४३ हजार ९२४ बालकांचे पोलिओ लसीकरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम जिल्ह्यात उत्स्फूर्तपणे राबविण्यात आली. या अंतर्गत रविवार (दि. २८) रोजी जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील एकूण १ लाख ४३ हजार ९२४ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्यात आली आहे. जिल्हाभरात २ हजार ३४१ लसीकरण बूथ उभारण्यात आले होते. कोणताही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी २९ जून ते ३ जुलैदरम्यान आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका घरभेटी देऊन २३ हजार २२७ बालकांना पोलिओ लस दिली. स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम कामगारांची वस्ती, वीटभट्ट्या, बसस्थानके, रेल्वे स्थानके तसेच दुर्गम भागांमध्ये विशेष पथकांद्वारे लसीकरण करण्यात आले आहे. यामुळे जिल्ह्यात १०४ टक्के लसीकरण झाले असल्याने पोलिओमुक्तीकडे जिल्ह्याची वाटचाल सुरू आहे.

० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला जवळच्या पल्स पोलिओ बूथवर घेऊन जाऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजावेत आणि पोलिओमुक्त रायगड घडविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार पालकांनीही लसीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत १ लाख ४३ हजार ९२४ बालकांना २८ जून रोजी लस देण्यात आली. यासाठी जिल्हाभरात २ हजार ३४१ लसीकरण बूथ उभारण्यात आले होते. त्यानंतर घरभेटीतून आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अंगावाडी सेविका यांनी २३ हजार २२७ वंचित बालकांना पोलिओ लस दिली. यासाठी आरोग्य विभागातर्फे पथके तयार करण्यात आली होती. यामध्ये ग्रामीण भागासाठी ५ हजार २३० पथके तर शहरी भागासाठी ५४० पथके तयार करण्यात आली होती. या पथकांनी २९ जून ते ३ जुलैदरम्यान स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम कामगारांची वस्ती, वीटभट्ट्या, बसस्थानके, रेल्वे स्थानके तसेच दुर्गम भागांमध्ये घरभेटी देउन वंचित राहिलेल्या बालकांना पोलिओ लस दिली. त्युमळे जिल्ह्यात एकूण १०४ टक्के बालकांना लसीकरण करण्यात आले आहे.



जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सूर्यवंशी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयेश गोसावी, माता–बाल संगोपन अधिकारी डॉ. दामोदर मोरे यांच्या मार्गदर्शनखाली आरोग्य विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका यांनी पोलिओमुक्त रायगडसाठी मेहनत घेतली.

पोलिओ लसीकरणाच्या दिवशी म्हणजेच २८ जून रोजी यावर्षी प्रथमच नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ येथे एक पोलिओ लसीकरण बूथ उभारण्यात आला होता.

पान १ वरुन

# पनवेल मनपा स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मंजुरी

महापालिका मालकीच्या वाहन विभाग अंतर्गत कार्यरत वाहनांची सन २०२६–२७ या आर्थिक वर्षात नियमित सर्व्हिसिंग व आवश्यक नवीन साहित्याची खरेदी करून दुरूस्ती करणे तसेच इतर अनुषंगिक किरकोळ खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतच्या विषयाला मान्यता देण्यात आली.

महापालिकेच्या शाळा क्र. १ दि.बा. पाटील शाळेमध्ये बहुउद्देशीय सभागृहात ऑडिओ व्हिजुअल पायाभूत सुविधा स्थापन करणेबाबतचा विषय स्थगित करण्यात आला. सार्वजनिक उद्यांनामध्ये–सार्वजनिक ठिकाणी बेंचेस पुरविणेकामी तीन वर्षांकरिता दरकरार करण्याबाबतचा विषय स्थगित करण्यात आला.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५:२:२ अन्वये हिंद–दी–चादर या कार्यक्रमाकरिता खरेदी केलेल्या साहित्यासाठी झालेल्या खर्चास व दरास मान्यता मिळणेबाबतच्या विषयास मंजुरी देण्यात आली. महापालिकेच्या विविध कार्यक्रमांकरिता सन २०२२–२३, २०२३–२४, सन २०२४–२५ या वर्षासाठी व सन २०२५–२६च्या निविदा मंजूर होईपर्यंतच्या कालावधीकरिता मंजूर झालेल्या निविदेच्या रकमेमध्ये सन २०२६–२७च्या निविदा मंजूर होईपर्यंतच्या कालावधीकरिता वाढीव रकमेस प्रशासकीय आर्थिक मंजुरी मिळण्याबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

पनवेल येथील गुजराती स्मशानभूमी सार्वजनिक शौचालय निष्कासित करून त्याच परिसरात नवीन सार्वजनिक शौचालय बांधण्याकामी मान्यता मिळण्याबाबतचा विषय स्थायी समितीने स्थगित केला.

# तळा तालुक्यात विजेचा खेळखंडोबा; नागरिक त्रस्त

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून वीजेचा खेळखंडोबा झाल्याने नागरिक त्रस्त झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.वीज कशामुळे खंडीत झाली आहे,याचे कारण अद्याप समजलेले नाही.

वादळ वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडत असल्याने व विद्युत सेवा दोन दिवस खंडीत झाल्याने वीजेच्या पंपाच्या साहाय्याने पाणी खेचेणे बंद झाल्याने भर पावसातही पाणी टंचाई निर्माण होत आहे.इंटरनेट,मोबाईल सेवा बंद असल्याने तळा तालुक्यातील नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

तळा शहराची विद्युत सेवा ६ जुलै रोजी पावणे बारा वाजता खंडीत झाली ती रात्री काहीकाळ चालू होती नंतर गेली ती सकाळी एखादं तास आली नंतर पुन्हा गेली ती ७ जुलै रोजी दुपारी साडेतीनच्या दरम्यान आली – गेली.मात्र हा विजेचा लपंडाव चालू असल्याने नागरीकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे तरी पाऊस पडला की लपंडाव चालू होतो.

# मतदार यादी शुद्धिकरणासाठी मोहीम

## आवश्यक कागदपत्रे तयार ठेवण्याचे महापौरांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) २०२६ कार्यक्रमांतर्गत ३० जून ते २९ जुलै या कालावधीत पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक घराला बूथ लेव्हल अधिकारी भेट देत आहेत. मतदारांनी घरी आलेल्या बीएलओंना प्रतिसाद देऊन आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी केले आहे.



मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने हे विशेष सखोल पुनरीक्षण अभियान राबविण्यात येत आहे. घरभेटीदरम्यान बीएलओंकडून आवश्यक माहिती आणि कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी त्यांना योग्य माहिती देऊन पूर्ण सहकार्य करावे.

घरभेटीपूर्वी नागरिकांनी voters.eci.gov.in किंवा ECINet App वर स्वतःचा तसेच कुटुंबातील सदस्यांचा मतदार यादीतील तपशील तपासून ठेवावा. बीएलओंकडून देण्यात येणारा गणना अर्ज काळजीपूर्वक भरून त्यावर स्वाक्षरी करावी. त्याची एक प्रत बीएलओंकडे द्यावी आणि दुसरी प्रत स्वतःकडे सुरक्षित ठेवावी. पुरावा म्हणून जन्माचा दाखला, पासपोर्ट, १०वीचे मॅट्रिक किंवा शैक्षणिक प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, सरकारी किंवा सार्वजनिक उपक्रम क्षेत्रातील कर्मचारी, निवृत्तीवेतन ओळखपत्र, राज्य, स्थानिक प्राधिकरणाची कुटुंब नोंदवही, शासनाने दिलेले जमीन किंवा घरवाटप प्रमाणपत्र, वन हक्क प्रमाणपत्र, राष्ट्रीय नागरिक नोंदणीचा पुरावा, बँक, टपाल कार्यालय, जीवन विमा महामंडळ किंवा सरकारने १ जुलै १९८७ पूर्वी दिलेले ओळखपत्र, प्रमाणपत्र यापैकी कोणतेही एक कागदपत्र ग्राह्य धरले जाईल

कोणताही पात्र मतदार वंचित राहणार नाही आणि कोणताही अपात्र व्यक्ती मतदार यादीत समाविष्ट होणार नाही. यासाठी सर्व मतदारांनी या मोहिमेत सहभागी होऊन बीएलओंना सहकार्य करावे, असे आवाहन महापौर नितीन पाटील यांनी केले आहे.

# नवीन पनवेलमध्ये पावसाचा विक्रम

## २४ तासांत ३५८ मिमीची नोंद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका हद्दीत गेल्या २४ तासांत मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. यामध्ये नवीन पनवेल येथे सर्वाधिक ३५८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. महापालिका क्षेत्रातील सरासरी पर्जन्यमान २१३.२० मिमी इतके नोंदविण्यात आले. जोरदार पावसामुळे शहरात झाडे व फांद्या कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त कैलास गावडे यांनी केले आहे.



पनवेल महापालिका क्षेत्रातील विविध भागांत २४ तासांत चांगला पाऊस झाला. नवीन पनवेल येथे ३५८ मिमी, पनवेल शहरात २२५ मिमी, खारघर येथे १३४.४ मिमी आणि कळंबोली येथे १३४.४ मिमी पावसाची नोंद झाली. या मुसळधार पावसामुळे नवीन पनवेल येथील बांठीया शाळेसमोरील रस्त्यावर पाणी साचले होते. तसेच नवीन पनवेल येथील समाज मंदिरातील आरोग्य केंद्रात जाण्यासाठी नागरिकांना पाय भिजवून जावे लागत होते. पावसाचा जोर कमी झाल्यानंतर काही तासांत पाणी ओसरले.आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या नोंदीनुसार शहरातील २९ ठिकाणी झाडे कोसळली, तर ५७ ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून पडल्या. तसेच तीन ठिकाणी इमारतींच्या स्लॅब किंवा बाल्कनीचे भाग कोसळल्याच्या घटना घडल्या. एका ठिकाणी बचावकार्यही करण्यात आले.

नागरिकांनी समुद्रकिनारे, खाड्या व नद्यांच्या परिसरात अनावश्यक वावर टाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी पनवेल महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाशी ०२२-२७४५८४०/४१ किंवा टोल-फ्री क्रमांक १८००२२७७०१वर संपर्क साधावा, असेही उपायुक्त कैलास गावडे यांनी सांगितले.

# कोळीवाडा ते बंदर रोडला पकटीमार्गे रस्ता द्या!

## नागरिकांची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील गाढी नदीला लागून असलेल्या कोळीवाडा ते बंदर रोड पकटीमार्गे नवीन रस्ता करावा, अशी मागणी परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात करत आहेत. याबत महाराष्ट्र शासनाच्या मेरीटाईम बोर्ड अर्थात सागरी महामंडळाने लक्ष घालावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

दरवर्षी मुसळधार पावसात कोळीवाडा पाण्याखाली जातो आणि त्यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होते. कोळी बांधव हे आपत्तीच्या वेळी नेहमीच लोकांच्या मदतीला धावून जातात, मात्र या भागातून पकटी मार्गे बंदर रोडपर्यंत जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग नसल्याने त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. हा मार्ग तयार करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# पावसाळ्यात धरणे-नदीपात्रांवर गर्दी : पनवेल पोलिसांकडून खबरदारीचा इशारा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांची गर्दी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन पनवेल तालुका पोलिसांनी महत्त्वपूर्ण सूचना जारी केल्या आहेत. परिसरातील धरणे, नदीपात्रे आणि पर्यटनस्थळांवर सुरक्षेच्या दृष्टीने नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांनी केले आहे. यासंदर्भात ठिकठिकाणी जनजागृतीपर बॅनरही लावण्यात आले आहेत.

नदीपात्रांमध्ये अनेक ठिकाणी खोल डोह आहेत आणि पावसामुळे अचानक पाण्याचा प्रवाह वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे पर्यटकांनी नदीपात्रात उतरणे टाळावे. विशेषतः लहान मुले, महिला तसेच पोहता न येणाऱ्या व्यक्तींनी पाण्यात उतरू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. गाडेश्वर धरणातून पनवेल शहराला पाणीपुरवठा होत असल्याने नदीपात्रात कोणताही कचरा किंवा वस्तू टाकून पाणी दूषित करू नये, असे आवाहनही करण्यात आले आहे. पर्यटनस्थळी मद्य, अमली पदार्थ किंवा इतर मादक द्रव्ये आणणे आणि सेवन करणे पूर्णतः मनाई


सूचना
पनवेल तालुका पोलीस ठाणे, नवी मुंबई

आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. परिसरातील रस्ते अरुंद आणि जंगलमय असल्याने वाहने रस्त्याच्या कडेला किंवा दुहेरी रांगेत उभी करू नयेत.

आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन दल आणि रुग्णवाहिकांना मार्ग मोकळा राहावा यासाठी वाहतूक नियमांचे पालन करावे. तसेच पर्यटकांनी वाहनांचा वेग नियंत्रित ठेवावा आणि मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, असेही सांगण्यात आले आहे. नागरिकांच्या जीवित आणि सुरक्षेच्या दृष्टीने गाडेश्वर धरण, वारदोली धबधबा, मोरबे धरण, कुंडी नदीपात्र, धरणोळी नदीपात्र, चिंध्रण, शांतिवन नदीपात्र तसेच माची प्रबळ परिसरात २६ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

स्थानिक नागरिकांनी आणि पर्यटकांनी या आदेशांचे पालन करावे. कोणतीही संशयास्पद किंवा नियमभंगाची घटना आढळल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा डायल ११२ वर तत्काळ संपर्क साधावा, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांनी केले आहे.

# कळंबोलीत संरक्षण भिंत कोसळून दुचाकींचे मोठ्या प्रमाणात नुकसान



**पनवेल, कळंबोली : वार्ताहर**

कळंबोलीतील सेक्टर ११ परिसरात वादळी वाऱ्यामुळे मोठी दुर्घटना घडली. हेरंब सहकारी गृहनिर्माण संस्थेजवळ सुरू असलेल्या इमारतीच्या बांधकामस्थळावरील उंच संरक्षण पत्रे आणि तात्पुरते कंपाउंड जोरदार वाऱ्यामुळे कोसळले. यामध्ये अनेक दुचाकींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

बांधकामस्थळी उभारण्यात आलेले संरक्षण पत्रे आणि तात्पुरते कंपाउंड वाऱ्याच्या वेगामुळे कोसळून शेजारील हेरंब सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संरक्षक भिंतीवर आदळले. या धडकेमुळे संरक्षक भिंतही कोसळली. भिंतीलगत उभ्या असलेल्या अनेक दुचाकी त्याखाली दबल्या गेल्याने वाहनांचे मोठे नुकसान झाले. घटनेनंतर परिसरात काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेचे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने कोसळलेले पत्रे आणि अवशेष बाजूला करून अडकलेल्या दुचाकी बाहेर काढल्या.

# नोकरीच्या आमिषाने महिलेला ९.७० लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा परिसरात घरकाम करणाऱ्या ३० वर्षीय महिलेला चांगल्या पगाराची नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीने नऊ लाख ७० हजार रुपये आणि सोन्याचे दागिने उकळले. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी संतोष वाळुंज याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार महिला मनस्वी जाधव या तळोजा फेज-१ मध्ये कुटुंबासह राहतात. ऑक्टोबर २०२४ मध्ये त्या घरकाम शोधत असताना त्यांची ओळख शेजारील साई रिव्हरडर इमारतीत राहणाऱ्या संतोष वाळुंज याच्याशी झाली. वाळुंज याने मनस्वी यांना आपल्या घरी घरकामासाठी ठेवले. महिनाभरातच वाळुंजने मनस्वी आणि त्यांच्या कुटुंबाचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने मनस्वी यांना चांगल्या पगाराची नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले. यासाठी काही खर्च करावा लागेल, असे सांगत तीन-चार महिन्यांत काम झाले नाही तर संपूर्ण पैसे परत करतो, असे आश्वासनही दिले.

वाळुंजच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मनस्वी यांनी दोन लाख रुपये दिले. कामाच्या प्रक्रियेचे कारण सांगून त्यांच्याकडून आणखी १४ हजार रुपये घेतले. यासोबतच मनस्वी यांच्या घरातील तब्बल ११ तोळे वजनाचे सोन्याचे दागिनेही त्याने स्वतःकडे जमा करून घेतले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच मनस्वी जाधव यांनी तळोजा पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदवली.

# पनवेल महापालिकेत आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुष्मान भारत डिजिटल मिशन (एबीडीएम) अंतर्गत नागरिकांमध्ये डिजिटल आरोग्य सेवांबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच आरोग्य सेवा अधिक प्रभावी व सुलभ करण्याच्या उद्देशाने महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत "मॉडेल पनवेल महानगरपालिका आढावा" या मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन मंगळवारी (दि. ७) क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके सभागृह, तिसरा मजला, पनवेल येथे करण्यात आले.



या कार्यक्रमास एबीडीएमचे राज्य समन्वयक डॉ. सायली शिलेवंत, विभागीय समन्वयक शोएब पठाण, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी मार्गदर्शन करताना महापौर नितीन पाटील म्हणाले, एबीडीएम अंतर्गत सर्व आरोग्य यंत्रणांची नोंदणी करून पालिका क्षेत्रातील नागरिकांना उत्तम दर्जाची सेवा देणे गरजेचे आहे. पंतप्रधानांच्या सूचनेप्रमाणे सर्व आरोग्य यंत्रणा डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्यासाठी सर्वांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने रायगड जिल्ह्याची एबीडीएमसाठी मॉडेल जिल्हा म्हणून निवड केली आहे. तसेच पनवेल महापालिकेची एबीडीएम अंतर्गत मॉडेल महानगरपालिका म्हणून निवड झाली आहे. यासाठी सर्व आरोग्य यंत्रणांनी एबीडीएम प्लॅटफॉर्मवर नोंदणी करणे बंधनकारक आहे. लवकरच महापालिकेकडून नागरिकांना आभा कार्ड व आयुष्मान भारत कार्ड काढून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. गिरीश गुणे यांनी सांगितले की लवकरच शासन क्लिनिकल इस्टॅब्लिशमेंट अॅक्ट लागू करणार असून एबीडीएममध्ये सर्व आरोग्य यंत्रणांनी नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील सर्व आरोग्य यंत्रणांनी वेळ न घालवता लवकरात लवकर नोंदणी करावी. डॉ. आनंद गोसावी म्हणाले, गतवर्षी पनवेल पालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट काम केल्याबद्दल एबीडीएम अंतर्गत नॅशनल हेल्थ मिशनने सन्मानित केले. एबीडीएमने रायगडला मॉडेल जिल्हा बनविण्याचे ठरविले आहे. यासाठी सर्व खासगी आरोग्य यंत्रणांनी एकत्र यावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यशाळेत राज्य समन्वयक डॉ. सायली शिलेवंत यांनी आयुष्मान भारत हेल्थ अकाउंट आयडी, डिजिटल हेल्थ रेकॉर्ड, हेल्थ फॅसिलिटी रजिस्ट्रेशन, डिजिटल आरोग्य सेवांचा वापर तसेच नागरिकांना मिळणारे विविध लाभ याबाबत सविस्तर सादरीकरण करून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## पं.स. सदस्य अंकुश खैर यांची तत्परता

**नवीन पनवेल :** पनवेलमधील मोरबे गावाजवळ पनवेलकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर पावसाच्या अतिवृष्टीमुळे झाड पडले होते. त्यामुळे रस्त्यावरील वाहतूकही काही वेळ ठप्प झाली होती. त्याचवेळी पंचायत समिती सदस्य अंकुश खैर हे काही कामासाठी त्या रस्त्याने जात होते. तेव्हा रस्त्यात झाड पडलेले पाहून अंकुश खैर यांनी स्वतः कोयता व कुऱ्हाडीच्या साहाय्याने ते झाड तोडून रस्त्याच्या बाजूला केले व वाहनांची वाहतूक सुरळीत केली. त्यामुळे चिंद्रण, मोरबे विभागातून त्यांच्या कामाचे कौतुक होत आहे.



# करंजाडेत शिव प्रतिष्ठानचा वृक्षारोपणाचा संकल्प

## नागरिकांना रोपांचे केले मोफत वाटप

**उरण : बातमीदार**

शिव प्रतिष्ठान करंजाडेच्या वतीने पर्यावरण जनजागृतीसाठी 'झाडे लावा झाडे जगवा' उपक्रम अगदी यशस्विरीत्या राबविण्यात आला. याअंतर्गत पदाधिकाऱ्यांनी स्वतः वृक्षारोपण केले तसेच नागरिकांना मोफत झाडे वाटप करून निसर्ग संवर्धनाचादेखील संदेश यावेळी देण्यात आला. पर्यावरणाचा सतत होणारा ऱ्हास आणि सजीव सृष्टीसमोरील धोक्याची जाणीव ठेवून शिव प्रतिष्ठान करंजाडेच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी निसर्गाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. त्याला चांगला प्रतिसाददेखील मिळत आहे.

शिव प्रतिष्ठान करंजाडे यांच्या वतीने 'एक झाड करंजाडेच्या मातीसाठी, एक झाड ऑक्सिजनयुक्त करंजाडेसाठी' ही संकल्पना यावेळी मोठ्या उत्साहात राबविण्यात आली. यावेळी करंजाडे येथे वड, पिंपळ, लिंब यांसारखी अनेक ऑक्सिजनयुक्त झाडे लावण्यात आली. तसेच नागरिकांना मोफत झाडे वाटप करण्यात आली. या कार्यक्रमात करंजाडेतील नागरिकांना आवाहन करण्यात आले की, कोणावर अवलंबून न राहता आपली



कामे आपण स्वतःच केली पाहिजेत. तरच आपले गाव आणि शहर उत्तमरीत्या संघटित होऊ शकते. त्यामुळे निसर्ग संवर्धनालाही चांगल्या प्रकारे हातभार लागू शकतो. प्रत्येकाने झाडे लावावीत आणि पर्यावरणाचे संवर्धन करावे.

या उपक्रमास शिव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सत्यजित पाटील, सचिव राकेश कुसळे, सुरेश बार्वे, अमर कुसळे, अमर सावंत, नवनाथ सहाणे, सतीश चालगे, तुषार कदम, योगेश कुलाल, अंबाराया पुजारी, समीर कांबळे आदी पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.



## पनवेलमध्ये होर्डिंगचा भाग कोसळला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील महामार्गाला लागून असलेल्या मिडलक्लास परिसरात उभारण्यात आलेल्या एका महाकाय होर्डिंगचा मोठा भाग थेट खाली रस्त्यावर कोसळल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून हे धोकादायक होर्डिंग तिथून काढण्यात यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांमधून पुढे येत आहे.

सुदैवाने होर्डिंगचा भाग कोसळला त्या क्षणी तेथून कोणीही जात नसल्याने मोठी जीवितहानी टळली. मिडलक्लास परिसर संपूर्णपणे रहिवासी असून येथे नागरिकांची आणि वाहनांची मोठी वर्दळ असते.

## डॉ. प्रियांका डोके-मंडलिक इंडियाज प्राइड अवॉर्डने सन्मानित

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय सिनेयुग प्रोडक्शन आणि अकादमी मुंबई यांच्या तर्फे इंडियाज प्राइड अवॉर्ड २०२६ या कार्यक्रमात नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील विधी महाविद्यालयाच्या एच.आर. एलएलएम को-ऑर्डिनेटर, एच.ओ.डी. आणि प्रोफेसर डॉ. प्रियांका डोके-मंडलिक यांना त्यांच्या कार्याचा गौरव करत इंडियाज प्राइड अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.



कारगिल युद्धात देशाचे रक्षण करताना आपले दोन्ही पाय गमावलेल्या सैनिक अधिकाऱ्यांच्या हस्ते डॉ. प्रियांका डोके-मंडलिक यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला निवृत्त न्यायाधीश, वकील तसेच पोलीस अधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रोफेसर डॉ. प्रियांका मंडलिक यांनी कायदा-सुव्यवस्था राखणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचे विशेष आभार मानले. सण असो किंवा इतर कोणताही प्रसंग असो, घरदार विसरून पोलीस आपले कर्तव्य पार पाडून सामान्य जनतेच्या हिताचे रक्षण करीत असतात, असे त्यांनी सांगितले.

## संपादकीय

# तत्पर प्रतिसादाने दिलासा

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील कनेक्टिंग लिंक मार्गातील बोगद्याजवळ दरड कोसळण्याच्या घटनेनंतर विरोधी पक्षांनी तातडीने राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात केली. नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर वस्तुस्थिती समजून घेण्याऐवजी सरकारला लक्ष्य करण्याचा प्रयत्न झाला. मात्र राज्य सरकारने टीकेला उत्तर देण्यात वेळ न घालवता परिस्थिती नियंत्रणात आणण्यावर आणि वाहतूक पूर्ववत करण्यावर लक्ष केंद्रित केले.

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील कनेक्टिंग लिंक मार्गातील बोगदा-२ जवळ सोमवारी पहाटे घडलेली दरड कोसळण्याची घटना ही सध्याच्या नैसर्गिक आव्हानांना ठळकपणे अधोरेखित करणारी आहे. हवामान बदलामुळे वाढलेली अतिवृष्टीची तीव्रता, सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये अतितीव्रतेने कोसळणारा पाऊस आणि तेथील विशिष्ट भौगोलिक रचना यामुळे तेथे दरडी कोसळण्याचा धोका कायम असतो. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग हा तर देशातील सर्वाधिक वर्दळीच्या आणि अभियांत्रिकीच्या दृष्टीने आव्हानात्मक मार्गांपैकी एक आहे. अशा परिस्थितीत तेथे दरड कोसळणे ही चिंतेची बाब असली तरी ती केवळ मानवी चुकीमुळे वा दुर्लक्षामुळेच घडली असा निष्कर्ष तातडीने काढणे योग्य ठरणार नाही. दरड कोसळल्याची माहिती मिळताच राज्य सरकार तातडीने कामाला लागले. वाहतूक नियंत्रण, पर्यायी मार्गांची व्यवस्था, मलबा हटविण्याचे काम आणि प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्यात आल्या. संकटसमयी सरकारने दाखविलेली कार्यक्षमता सरकारच्या सजगतेची साक्ष देणारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या विकासाला अभूतपूर्व गती दिली आहे. समृद्धी महामार्ग, अटल सेतू, सागरी किनारा मार्ग, मेट्रो प्रकल्प आणि विविध द्रुतगती मार्ग अशा व्यापक विकासकामांच्या पार्श्वभूमीवर एखाद्या नैसर्गिक आपत्तीला विकास धोरणाचे अपयश ठरवण्याचा प्रयत्न वस्तुस्थितीपासून दूर नेणारा ठरतो. जगभरात नैसर्गिक आपत्तीतून अशा घटना घडतात तेव्हा प्रशासन किती वेगाने प्रतिसाद देते आणि भविष्यातील धोके कमी करण्यासाठी काय उपाययोजना करते याकडे लक्ष दिले जाते. या दोन्ही बाबतीत महाराष्ट्र सरकारची भूमिका निश्चितच लक्षात घेण्याजोगी आहे. विरोधकांनी पायाभूत सुविधांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करणे स्वाभाविक आहे. परंतु दुर्दैवाने काही राजकीय पक्ष प्रत्येक आपत्तीमध्ये सरकारला लक्ष्य करण्याची संधी शोधतात. वास्तविक अशा संकटसमयी सगळ्यांनीच टीकेपेक्षा सरकारच्या प्रयत्नांना पाठबळ देणे आवश्यक असते. राज्य सरकारने यापूर्वीच संवेदनशील घाट विभागांमध्ये संरक्षक जाळ्या, रिटेनिंग वॉल्स, ड्रेनेज सुधारणा आणि भूवैज्ञानिक सर्वेक्षण यांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी दिला आहे. आता या घटनेनंतर आणखी प्रगत तंत्रज्ञान, रिअल-टाइम मॉनिटरिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने भूस्खलनाचा अंदाज घेणाऱ्या प्रणाली विकसित करण्यावर भर दिला जाईल अशी अपेक्षा आहे. सरकारची कार्यपद्धती ही समस्यांमधून शिकून अधिक सक्षम व्यवस्था उभारण्याची राहिली आहे. नैसर्गिक शक्तींच्या तीव्रतेपुढे शून्य जोखीम अशक्य असली तरी जोखीम कमीत कमी करण्यासाठी शासन सातत्याने गुंतवणूक करत आहे. त्यामुळेच या घटनेतून मिळालेल्या धड्यांकडे आपण पहायला हवे. अतिवृष्टीच्या घटना अधिक तीव्र होत आहेत. त्यामुळे रस्ते, पूल आणि डोंगराळ भागांतील पायाभूत सुविधांच्या डिझाइनमध्ये नव्या हवामान वास्तवाचा विचार आवश्यक आहे. राज्य सरकारने प्रगत निरीक्षण यंत्रणेचा वापर अधिक व्यापक केला पाहिजे. नागरिकांनीही मुसळधार पावसाच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करणे टाळायला हवे. प्रशासनाने दिलेल्या वाहतूक सूचनांचे पालन करायला हवे आणि आपत्कालीन परिस्थितीत अफवा पसरविण्याऐवजी अधिकृत माहितीवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे.**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना



राज्यातील शेतकऱ्यांना दरवर्षी निसर्गाच्या लहरीपणाशी झुंज द्यावी लागते. मेहनतीने पेरणी, मशागत आणि काळजी घेऊनही कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळामुळे हाती आलेलं पीक हातून जातं. पीक न आल्याने उत्पन्न बुडतं आणि बँकेकडून शेतीसाठी घेतलेलं कर्ज फेडणं अशक्य होतं. यामुळे शेतकरी वर्ग नापिकी आणि कर्जाच्या दुष्टचक्रात अडकून पडतो आणि भविष्याची चिंता सतावते.शेतकऱ्यांच्या या अडचणी लक्षात घेऊन शासनाने मोठा निर्णय घेतला आहे.

शेतकरी वर्गाला प्राधान्य देणाऱ्या सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर केली आहे. राज्याच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती असून याचा थेट लाभ राज्यातील ५८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना होणार आहे. या योजनेनुसार शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे अल्पमुदतीचे पीक कर्ज पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. ज्यांचे कर्ज दोन लाखांपेक्षा अधिक आहे अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांपेक्षा जास्त असलेली थकीत रक्कम भरल्यानंतर त्यांनाही या योजनेचा लाभ मिळू शकेल. यामुळे मध्यम आणि मोठ्या कर्जबाजारी शेतकऱ्यांनाही दिलासा मिळणार आहे. केवळ थकबाकीदारच नाही तर नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही यात विचार झाला आहे.

जे शेतकरी वेळेवर कर्जाचे हप्ते भरतात अशा कष्टकरी शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांची प्रोत्साहनपर रक्कम दिली जाणार आहे. यामुळे कर्जाची नियमित परतफेड करण्याला चालना मिळेल आणि शेतीसाठीचा पतपुरवठा सुरळीत राहण्यास मदत होईल.शासनाने शेतकऱ्यांना पीक कर्जासोबत पिक विमा काढण्याचे आवाहन केले आहे. प्रधानमंत्री फसल विमा योजना या माध्यमातून नैसर्गिक आपत्ती, किडीचा प्रादुर्भाव किंवा इतर कारणांमुळे पिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा कंपन्यांकडून वेळोवेळी भरपाई मिळते.

यामुळे जोखीम कमी होऊन शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळत आहे.बीड जिल्हा हा मुख्यत्वे शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर आधारित आहे. येथील मोठ्या संख्येने शेतकरी या योजनेचा लाभ घेतील. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत बीडमधील शेतकऱ्यांचे कर्जमाफीमुळे आर्थिक ओझे हलके होणार आहे. यापूर्वीही शासनाने नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे काम केले आहे. जिल्ह्यात २०२५-२६ च्या खरीप हंगामात अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले होते.

त्यासाठी शासनाने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना १४५८ कोटी रुपयांहून अधिक मदत दिली. त्याचप्रमाणे याच वर्षी रब्बी हंगामातील पेरणीसाठी ६५० कोटी रुपयांचे अनुदानही वितरित करण्यात आले. पिक विमा भरपाई ही वेगळी प्रक्रिया असून आता कर्जमाफीचा लाभही त्यात भर पडणार आहे.शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा आणि अन्नसुरक्षेचा कणा आहे. त्यांना सक्षम करणे हे शासनाचे प्राधान्य आहे. नापिकी आणि कर्जाच्या दुष्टचक्रातून शेतकऱ्याला बाहेर काढून त्याला आत्मनिर्भर बनवणे हेच या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**-प्रशांत दैठणकर, प्र. उपसंचालक तथा जिल्हा माहिती अधिकारी, बीड**




# मराठी साहित्यातील 'कलंदर फकीर': गोपाल नीलकंठ दांडेकर

गोपाल नीलकंठ दांडेकर सहयाद्रीच्या कडेकपाऱ्या, गड-किल्ले यांच्या कुशीत रमलेले, पूर्णेपासून नर्मदेपर्यंत अवघ्या मुलखाचे पाणी चाखलेले, शिवबाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या हरेक गडावरची धूळ मस्तकी धारण करणारेव्यक्तिमत्त्व. शिवरायांचे पदचिन्ह, हाताचा ठसा व अस्थिशेष आपल्यापाशी आहे, याची श्रीमंती बाळगणारा हा अस्सल मराठी मातीतला माणूस.या साऱ्या भटकण्याचेच अनुभव झाले. या अनुभवांतूनच साहित्य प्रसवले. त्यातून मराठी मातीशी नाते सांगणाऱ्या, छत्रपतींच्या काळात नेणाऱ्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. अखंड भ्रमंतीतून आलेले आगळेवेगळे



अनुभवच शब्दरूप घेऊन आले. गोनीदां ऊर्फ अप्पांचा जन्म ८ जुलै १९१६ रोजी अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील परतवाडा येथे झाला. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांनी घर सोडले. तेव्हापासून त्यांच्या पायाला भिंगरी लागली ती कायमचीच. संत गाडगेबाबांजवळ ते राहिले, त्यांच्याबरोबर हिंडले. 'सोपे लिहिणे व बोलणे ही गाडगेबाबांची देणगी;' असे गोनीदां म्हणत नर्मदेची पायी परिक्रमा हा गोनीदांच्या जीवनातला एक रोमहर्षक भाग होता. या परिक्रमेत त्यांनी जीवन पाहिले. या अनुभवाचा त्यांना पुढे लेखनात फार उपयोग झाला.त्यांच्या आत्मचरित्रात्मक 'स्मरणगाथा'ला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.महाराष्ट्र शासनाचा 'महाराष्ट्र गौरव' पुरस्कारही त्यांना मिळाला.

(साभार इंटरनेट)




## इंडक्शन शेगडी सुरक्षित आहे का?

गेल्या काही वर्षांत स्वयंपाकघरात मोठा बदल झाला आहे. गॅस शेगडीला पर्याय म्हणून आता अनेक घरांमध्ये इंडक्शन शेगडी दिसू लागली आहे. वेगवान स्वयंपाक, स्वच्छता आणि



वीज बचतीमुळे इंडक्शनला प्राधान्य मिळत आहे. पण तरीही अनेकांच्या मनात एक प्रश्न कायम असतो की इंडक्शन शेगडी खरोखर सुरक्षित आहे का?या प्रश्नाचे उत्तर देताना आयआयटी दिल्लीचे प्रा. निखिल वर्मा सांगतात की, तंत्रज्ञानाच्या दृष्टीने पाहिल्यास इंडक्शन ही गॅसपेक्षा अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम पद्धत आहे.

गॅस शेगडीमध्ये ज्वाला थेट भांड्याला आणि सभोवतालच्या हवेला गरम करते. याउलट इंडक्शन शेगडीमध्ये इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड तयार होते. हे फील्ड फक्त चुंबकीय गुणधर्म असलेल्या भांड्याच्या तळाशी थेट उष्णता निर्माण करते. त्यामुळे शेगडीचा वरचा काचेचा पृष्ठभाग फारसा गरम होत नाही, फक्त त्यावर ठेवले भांडे गरम होते. या कारणामुळेच हात भाजण्याचे, कपडा पेटण्याचे किंवा आग लागण्याचे धोके खूप कमी होतात. तसेच गॅस गळती, गॅसचा स्फोट किंवा कार्बन मोनॉक्साईड सारख्या समस्याही येथे नसतात.

प्रा. वर्मा यांच्या मते इंडक्शन शेगडी सुमारे ९० टक्के ऊर्जा कार्यक्षम आहे. म्हणजे विजेपासून मिळणाऱ्या ९० टक्के ऊर्जेचा वापर थेट स्वयंपाकासाठी होतो. तुलनेत गॅस शेगडीची कार्यक्षमता फक्त ४० टक्के आहे. उरलेली ६० टक्के ऊर्जा हवेत आणि आजूबाजूला वाया जाते. यामुळेच इंडक्शनवर पाणी लवकर उकळते, डाळ-भात लवकर शिजतो आणि विजेचे बिलही नियंत्रणात राहते. वेळेची बचत होते आणि स्वयंपाक अधिक सोयीस्कर होतो.

इंडक्शनबाबत सर्वात जास्त चर्चा होते ती इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड अर्थात EMF बद्दल. प्रा. वर्मा स्पष्ट करतात की इंडक्शनमध्ये निर्माण होणारे EMF हे अत्यंत कमी फ्रिक्वेन्सीचे असतात. हे फील्ड भांड्याच्या तळापुरतेच मर्यादित असते आणि भांड्यापासून काही सेंटीमीटर अंतरावर गेल्यावर त्याची तीव्रता जवळपास नगण्य होते. पेसमेकर असलेल्या रुग्णांसाठी मात्र थोडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. एकंदरीतच पुरातन काळच्या शेगडीची जागा आता इंडक्शन शेगडीने घेतली आहे. तरी तिचा वापर आणि उपयुक्तता हा भाग प्रत्येकानुसार वेगवेगळा असू शकतो. वेगवान स्वयंपाक, स्वच्छता आणि वीज बचतीमुळे इंडक्शनला प्राधान्य मिळत आहे.

# मराठ्यांचा इतिहास लिहिणारा ग्रँट डफ



## निमित्त

मराठ्यांच्या इतिहासावर लिहिणारा सुप्रसिद्ध इतिहासकार कॅप्टन जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ. त्याचा जन्म ८ जुलै १७८९ रोजी बॅम्फ (स्कॉटलंड) येथे झाला. प्राथमिक शिक्षणानंतर त्याने अबर्डीन येथील मार्शल महाविद्यालयात प्रवेश घेतला, पण शिक्षण अपुरे टाकून तो सोळाव्या वर्षी ईस्ट इंडिया कंपनीत मुंबईच्या लष्करात नोकरीला आला.

१८०६ साली बॉम्बे नेटिव्ह इन्फट्री अथवा बॉम्बे ग्रेनेडिअर्समध्ये त्याला अधिकाराची जागा मिळाली. एल्फिन्स्टनने त्यास मुद्दाम पुण्यास बोलावून घेतले. १८१७च्या खडकी येथील मराठ्यांबरोबरच्या युद्धात त्याने प्रसंगावधान दाखवून शौर्य दाखविले. या सुमारास त्याचा एल्फिन्स्टनशी चांगला परिचय झाला आणि त्यास कॅप्टन हा किताब मिळाला. १८१८मध्ये त्याची एल्फिन्स्टनने साताऱ्यास पोलिटिकल एजंट म्हणून नियुक्ती केली. तो साताऱ्यास १८१८ ते १८२२ अशी चार वर्षे राहिला आणि साताऱ्याची राजकीय व्यवस्था लावून प्रतापसिंहास सुशिक्षित केले.

१८२३च्या जानेवारीत तो मायदेशी रजा घेऊन गेला, तो पुन्हा हिंदुस्तानात परत आला नाही. १८२५मध्ये त्याने कंपनीच्या नोकरीचा राजीनामा दिला. . १८२५मध्ये जेन कॅथरिन या तरुणीशी त्याने विवाह केला. तिची काही संपत्ती त्यास मिळाली. म्हणून उर्वरित आयुष्य त्याने आपली संपत्ती व शेती यांची देखभाल करण्यात घालविण्याचे ठरविले.

एल्फिन्स्टनच्या आज्ञेप्रमाणे त्याने ऐतिहासिक कागदपत्रांचा शोध घेऊन १९ जुलै १८१९ रोजी मराठ्यांचा सुसंगत इतिहास लिहिण्याचे कार्य अंगीकारले. थोड्याच अवधीत एल्फिन्स्टनच्या अनुमतीने त्याने लेखनकार्यास आरंभ केला. सातारचे महाराज तसेच अनेक संबंधित सरदार, सरदेशमुख, देशपांडे आणि आदिलशाही, निजामशाही येथील तवारिखा व मराठी बखरी तसेच पत्रे जमवून माहिती गोळा केली. यामध्ये त्यास बाळाजीपंत नातू यांचे फार सहाय्य झाले. हा सर्व इतिहास त्याने एल्फिन्स्टन, ब्रिग्झ, व्हॅन्स केनेडी, विल्यम अर्स्किन, बाळाजीपंत नातू यांना दाखविला व मसुदा तयार केला (१८२२).

जॉन मरे पब्लिशर्स लि. कंपनीने या पुस्तकाचे 'मोगल सत्तेचा ऱ्हास आणि ब्रिटीश सत्तेचा उदय' असे नामकरण केल्यास छापू म्हणून कळविले. तेव्हा मला मराठ्यांचाच इतिहास केवळ सांगावयाचा आहे, असे बाणेदार उत्तर देऊन त्याने स्वखर्चाने लाँगमन्स लि. कंपनीकडून १८२६मध्ये हिस्टरी ऑफ द मराठाज हा ग्रंथ छापून प्रसिद्ध केला. या व्यवहारात त्यास त्या वेळी दोन हजार पौंड खर्च आला. त्यापैकी तीनशे पौंड कसेबसे वसूल झाले. १९२१पर्यंत या ग्रंथाच्या सहा आवृत्या निघाल्या.

१८२९मध्ये कॅ. डेव्हिड केपेन व बाबा साने यांनी या ग्रंथाचे मराठ्यांची बखर या शीर्षकाने मराठीत भाषांतर केले. त्याच्याही सहा आवृत्या निघाल्या. त्याच्या ग्रंथावर प्रथम कुठेच समीक्षण आले नाही व टीकाही झाली नाही, मात्र त्याच्या हिस्टरी ऑफ द मराठाज या ग्रंथावर सडेतोड टीका केली. तथापि, मराठ्यांचा सुसंगत इतिहास लिहिण्याचा त्याचा प्रयत्न सर्वांनी मान्य केला.

एडन येथे स्थायिक झाल्यावरही त्याचा प्रतापसिंह व एल्फिन्स्टन यांच्याशी प्रदीर्घ काळ पत्रव्यवहार चालू होता. सातारच्या राजाची पदच्युती आणि राज्य खालसा (१८४८) यासंबंधीची ब्रिटिश नीती त्याला आवडली नाही. **-अ. रा. कुलकर्णी**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

## स्ट्रॉबेरीच्या पानांचाही होतो शरीराला फायदा

सर्वसाधारणपणे १०० रुपयांचा वाटा अशी मिळणारी लाल, रसाळ स्ट्रॉबेरी सगळ्यात आधी डोळ्याला भावते. स्ट्रॉबेरीचे असंख्य फायदे हे सर्वमान्य आहेत, फक्त स्ट्रॉबेरीच नव्हे; तर त्याची पानंसुद्धा आरोग्यासाठी खूपच गुणकारी ठरू शकतात. स्ट्रॉबेरीच्या पानांमध्ये पॉलिफेनॉल हे अँटिऑक्सिडंट व व्हिटॅमिन सी असते. याव्यतिरिक्त ते इतर पोषक तत्वांनी भरलेले असतात जे आपल्या शरीरासाठी फायदेशीर असतात. स्ट्रॉबेरीच्या पानांचे काही फायदे खालीलप्रमाणे...



व्हिटॅमिन आणि मिनरल बूस्ट: स्ट्रॉबेरीची पाने व्हिटॅमिन सीचा एक उत्तम स्रोत आहेत, जी रोगप्रतिकारक शक्तीसाठी आवश्यक आहे. याशिवाय स्ट्रॉबेरीच्या पानांमध्ये जीवनसत्त्वे ए, के, लोह आणि कॅल्शियम सारखी खनिजे देखील असतात.

अँटिऑक्सिडंटचा पॉवरहाऊस: स्ट्रॉबेरीच्या पानांमध्ये फ्लेव्होनॉइड्ससारखे अँटिऑक्सिडंट्ससुद्धा मुबलक प्रमाणात असतात. हे अँटिऑक्सिडंट्स मुक्त रॅडिकल्सचा सामना करण्यास मदत करतात आणि आजारांचा धोका कमी करू शकतात.

**रक्तातील साखरेचे नियमन :** काही अभ्यासात असे दिसून आले आहे की, स्ट्रॉबेरीची पाने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करू शकतात.

**पचनाला सहाय्य :** स्ट्रॉबेरीचे पाने आहारात फायबर जोडतात, ज्यामुळे आतड्यांचे आरोग्य सुधारू शकते. तसेच पोट स्वच्छ होण्यासही हातभार लागू शकतो.

स्ट्रॉबेरीच्या बऱ्याच जातींची पाने खाण्यायोग्य असतात, परंतु वापरासाठी एकही 'सर्वोत्तम' प्रकार नाही. पानांवरील कीटकनाशकांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी सेंद्रिय, ताज्या स्ट्रॉबेरीची निवड करा. फळांच्या तुलनेत स्ट्रॉबेरीच्या पानांची चव वेगळी असते. मल्होत्रा पुढे सांगतात, त्यात किंचित तुरट, गोड, चव असते तर पोत पालकापेक्षा पातळ असू शकतो. त्याचा वापर स्वयंपाकात कसा करता येईल हे पाहूया..

**सॅलड्स :** स्ट्रॉबेरीची बारीक चिरलेली पाने सॅलडमध्ये उत्तम चवीची जोड करू शकतात.

**चहा आणि पेये :** स्ट्रॉबेरीची पाने हर्बल चहासाठी उत्तम ठरतात.

# राजीव साबळे यांच्या सामाजिक स्वप्नासाठी संपूर्ण राजकीय ताकद लावेन -खासदार तटकरे

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावच्या विकासाच्या वाटचालीत मंगळवार हा दिवस एका नव्या पर्वाची नांदी ठरला. सामाजिक बांधिलकी, शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रात उभारल्या जात असलेल्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा केवळ शुभारंभच झाला नाही,तर त्यांच्या यशस्वी पूर्ततेची ठोस राजकीय हमीही मिळाली. खासदार सुनील तटकरे यांनी स्पष्ट शब्दांत घोषणा केली की,"अॅड.राजीव साबळे यांनी माणगावच्या भविष्यासाठी हाती घेतलेल्या प्रत्येक सामाजिक उपक्रमामागे माझी संपूर्ण राजकीय ताकद उभी राहील. ही केवळ आश्वासनांची भाषा नाही, तर विकासासाठी दिलेले वचन आहे."



## अॅड. राजीव साबळे यांनी मंत्री भरत गोगावले यांची मागितली जाहीर माफी

या सोहळ्यात निवडणुकी दरम्यान झालेल्या काही वक्तव्यांबाबत आत्मपरीक्षण करत अॅड. राजीव साबळे यांनी सार्वजनिक व्यासपीठावरून मंत्री भरत गोगावले यांची जाहीर माफी मागितली. "राजकारणात मतभेद असू शकतात; परंतु समाजहित आणि विकास यापेक्षा मोठे काहीही नाही," असा संदेश त्यांच्या या भूमिकेतून अधोरेखित झाला.

राजीव साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे भूमिपूजन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जलतरण तलावाचे लोकार्पण खासदार तटकरे यांच्या हस्ते झाले.या कार्यक्रमात बोलताना तटकरे यांनी माणगाव नाट्यगृहासाठी आठ दिवसांत पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर केला जाईल,नर्सिंग कॉलेजचा शुभारंभ याच महिन्यात होईल,फिजिओथेरपी कॉलेजसाठी आवश्यक सर्व परवानग्या मिळवून दिल्या जातील, तसेच मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या उभारणीसाठी सर्वतोपरी मदत केली जाईल,अशी त्यांनी ग्वाही दिली.

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी सांगितले की, या संस्थेने ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा दिली आहे. त्या परंपरेला आधुनिक शिक्षणाची जोड देण्याचे मोठे कार्य अॅड. राजीव साबळे यांनी केले असून, आज "माणगाव हे कोकणातील शिक्षणाचे विश्वासार्ह केंद्र बनले आहे," असे गौरवोद्गार त्यांनी काढले. दिवंगत अशोकदादा साबळे यांच्या योगदानाचा उल्लेख करताना तटकरे म्हणाले की, त्यांनी लोकसेवा आणि विकासाची जी परंपरा निर्माण केली, तीच परंपरा आज राजीव साबळे नव्या उमेदीने पुढे नेत आहेत. राजीव साबळे यांच्या प्रकृतीचा उल्लेख करताना ते म्हणाले, "प्रकृतीची साथ कमी असली तरी इच्छाशक्ती प्रचंड आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर समाजासाठी काम करण्याचे धाडस फार कमी लोकांमध्ये असते. अशा कार्यकर्त्याच्या पाठीशी उभे राहणे हे माझे कर्तव्य आहे." मुंबईगोवा महामार्गावरील अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळावेत, यासाठी उभारण्यात येणारे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल संपूर्ण रायगडसाठी वरदान ठरेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भविष्यात रायगड जिल्ह्याची पुनर्रचना झाल्यास माणगाव हे जिल्ह्याचे मुख्यालय होण्याची क्षमता बाळगते,असे सांगत त्या दृष्टीने आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमास माजी आमदार संजय कदम, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, सभापती विलास शिंदे, उपनगराध्यक्षा रिया उभारे, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, राष्ट्रवादीचे दीपक जाधव,चंद्रशेखर खानविलकर, चंद्रशेखर देशमुख, नरेंद्र गायकवाड, डॉ. गौतम जाधव, डॉ. आबासाहेब पाटणकर, अॅड. विनोद घायाळ, नितीन बामगुडे, निकिता साबळे आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांसह हजारो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबा नदीच्या पुराने नागोठणे जलमय; व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान

**नागोठणे : बातमीदार**

अंबा नदीला रविवार (दि. ५ जुलै) रोजी आलेल्या महापुरामुळे नागोठणे बाजारपेठ, कोळीवाडा व परिसरातील अनेक भाग जलमय झाले. बाजारपेठेतील रस्त्यांवर तब्बल १० ते १२ फूट तर अनेक दुकानांमध्ये ७ ते ८ फूट पुराचे पाणी शिरल्याने व्यापारी वर्गाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

पुराचे पाणी काही प्रमाणात उतरून अवघे २४ तास होत नाहीत तोच पुन्हा पाण्याची पातळी वाढल्याने व्यापाऱ्यांना आपला माल सुरक्षित ठिकाणी हलविण्यास पुरेसा वेळ मिळाला नाही. परिणामी किराणा, स्टेशनरी, कापड, दूध डेअरी, चणे विक्रेते, भाजी विक्रेते, हार्डवेअर, इलेक्ट्रिक साहित्य, फळ विक्रेते, पानटपऱ्या, चप्पल दुकाने तसेच इतर अनेक व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या नुकसानीची रक्कम लाखोंच्या घरात असल्याचे सांगितले जात आहे.



या सर्व नुकसानाचा तातडीने पंचनामा करून शासनाने व्यापाऱ्यांना त्वरित आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नागोठणे व्यापारी असोसिएशनचे उपाध्यक्ष अनिलशेठ काळे यांनी केली आहे. तसेच लोकनेते खासदार सुनिल तटकरे यांनी या गंभीर परिस्थितीकडे लक्ष देऊन व्यापाऱ्यांना दिलासा मिळवून द्यावा, अशी अपेक्षाही अनिलशेठ काळे यांनी व्यक्त केली.

दरम्यान, पूरग्रस्तांच्या मदतीसाठी रिलायन्स कंपनीच्या नागोठणे युनिटचे अध्यक्ष शशांक गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली रिलायन्स फाउंडेशनच्या सीएसआर विभागाने तत्पर मदतकार्य राबविले. टीम लीडर वरधा कुलकर्णी, रॉयस्टन सरेराव व सीएडी टीमने नागोठणे ग्रामपंचायतीच्या सहकार्याने पूरग्रस्त नागरिकांना नाश्ता, जेवण आणि पिण्याच्या पाण्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली.


मुसळधार पावसामुळे नागोठणे परिसरात सलग तीन दिवस वीज व पाणीपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांचे मोठे हाल झाले. मंगळवारी पावसाचा जोर काहीसा कमी झाल्याने पुराचे पाणी ओसरू लागले आणि बाजारपेठेत पुन्हा नागरिकांची वर्दळ वाढली. व्यापारी नुकसानग्रस्त माल बाहेर काढण्यात व्यस्त असतानाच खरेदीसाठी नागरिकांनीही बाजारपेठेत मोठी गर्दी केली. मंगळवारी दुपारी सुमारे ३ वाजता वीजपुरवठा पूर्ववत झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून आता पाणीपुरवठा सुरळीत कधी होणार, याची प्रतीक्षा नागोठणेकरांना लागली आहे.

# रायगडात अतिदुर्मीळ पांढऱ्याशुभ्र अल्बिनो चंचू वाळा सापाचे दर्शन

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर निसर्गाचा एक विलक्षण चमत्कार पाहायला मिळाला आहे. माणगाव तालुक्यात अत्यंत दुर्मिळ मानला जाणारा पांढऱ्याशुभ्र 'अल्बिनो चंचू वाळा' (Grypotyphlops acutus) हा बिनविषारी साप आढळून आल्याने वन्यजीव अभ्यासकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. या दुर्मिळ सापाची नोंद जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.

सध्या रायगडसह संपूर्ण कोकणात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे जमिनीखाली राहणाऱ्या अनेक भूचर सापांची बिळे पाण्याने भरली आहेत. त्यामुळे सुरक्षित आणि कोरड्या जागेच्या शोधात हे साप बाहेर पडत आहेत. अशाच परिस्थितीत सोमवारी (दि. ६ जुलै) माणगाव



तालुक्यातील ओलसर शेत परिसरात हा दुर्मिळ साप आढळून आला.

स्थानिक नागरिक योगेश तुपट यांनी या सापाचा वेगळा चकचकीत पांढरा रंग आणि वैशिष्ट्यपूर्ण आकार पाहून माणगावचे वन्यजीव अभ्यासक शंतनू कुवेसकर यांच्याशी संपर्क साधला असता हा 'अल्बिनो चंचू वाळा' असल्याची पुष्टी झाली.

'चंचू वाळा' म्हणजे काय?

'चंचू वाळा' Beaked Worm Snake (Grypotyphlops acutus) हा पूर्णपणे बिनविषारी आणि जमिनीखाली राहणारा साप आहे. तो प्रामुख्याने मातीमध्ये, कुजलेल्या पानांच्या ढिगाऱ्याखाली किंवा शेतीतील ओलसर जमिनीत वास्तव्य करतो. वाळवी आणि मुंग्यांची अंडी हे त्याचे प्रमुख खाद्य आहे. आकाराने लहान असलेल्या या सापाचे तोंड पुढील बाजूस चोचीसारखे दिसत असल्यामुळे त्याला 'चंचू वाळा' असे नाव पडले आहे.

'अल्बिनो' ही अत्यंत दुर्मिळ जनुकीय अवस्था असून, शरीरातील रंगद्रव्ये (पिगमेंट्स) पूर्णपणे किंवा जवळपास नसल्यामुळे प्राण्याचा रंग पांढरा किंवा फिकट गुलाबी दिसतो. अशा प्राण्यांना निसर्गात स्वतःचा बचाव करणे कठीण असल्याने त्यांचे दीर्घकाळ तग धरणे अत्यंत दुर्मिळ मानले जाते.

याबाबत वन्यजीव अभ्यासक शंतनू कुवेसकर म्हणाले, "अल्बिनो चंचू वाळा आढळणे ही अत्यंत दुर्मिळ घटना आहे. हा जैविक दृष्ट्या महत्त्वाचा जनुकीय बदल दर्शवणारा नमुना असून, वर्णहीन असूनही या सापाने नैसर्गिक अधिवासात तग धरत वाढ केली आहे, ही विशेष बाब आहे. नुकतेच चिपळूण येथेही अशा प्रकारचा पांढरा मुंगूस आढळून आला होता. त्यामुळे कोकणातील जैवविविधतेमध्ये अशा दुर्मिळ जनुकीय वैशिष्ट्यांच्या नोंदी वाढत असल्याचे दिसून येते."

वन्यजीव अभ्यासकांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा प्रकारचे दुर्मिळ किंवा अपरिचित साप अथवा इतर वन्यजीव आढळल्यास घाबरून त्यांना इजा करू नये किंवा मारू नये. त्याऐवजी तात्काळ वनविभाग किंवा स्थानिक सर्पमित्रांशी संपर्क साधावा. वन्यजीव संवर्धनालाही त्यातून मोठी मदत मिळते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन
मौजे मोर्बे, ता. पनवेल, जि. रायगड,

| सर्व्हे नंबर /गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ९५ | १ | ० – ३७ – ००<br>पो.ख. ० – ०२ – ५० | ३.३१ | श्री. निनाथ भाऊसाहेब शिंगाडे |
| | एकूण | ० – ३९ – ५० | | |

पनवेल.
दिनांक : ०७/०७/२०२६.

सही/–
अॅड. जयवंत एकनाथ भोपी
अॅडव्होकेट
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नं. ९०२२३१७७७२.



## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

क्र. मृत्यू/रजि/एसआर /२०२६

१) श्री. गणेश शांताराम साळोखा ऊर्फ साळुंखे
रा. कलोते मोकाशी, ता. खालापुर, जि. रायगड } **वादी**

**विरुध्द**

२) निबंधक, जन्म – मृत्यु नोदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत कलोते मोकाशी, ता. खालापूर, जि. रायगड } **प्रतिवादी**

**जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. गणेश शांताराम साळोखा ऊर्फ साळुंखे, रा. कलोते मोकाशी, ता. खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यांनी यांचे आजोबा कै. गोपाळ गोविंद साळोखा ऊर्फ साळुंखे यांचा मृत्यू दिनांक ०१/०६/१९५१ रोजी कलोते मोकाशी, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि. ०७/०७/२०२६ रोजी माझे सहीने व शियानिशी दिली असे.

**ठिकाण :– खालापूर**
**दिनांक:– ०७/०७/२०२६**

शिक्का

**सही/–**
**(अभय चव्हाण)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार खालापूर


## शिष्यवृत्ती परीक्षेत 'अभिनव'चा शिवम धुमाळ कर्जत तालुक्यात पहिला

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेने पुन्हा एकदा आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे. शाळेचा विद्यार्थी कुमार शिवम योगेश धुमाळ याने शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत तालुक्यात प्रथम आणि रायगड जिल्ह्यात आठवा क्रमांक पटकावला आहे.



शिवमच्या यशा मागे त्याचे वडील योगेश धुमाळ व आई रेश्मा धुमाळ यांचे प्रेरणादायी सहकार्य लाभले आहे. घरातून मिळालेली शिस्त, प्रोत्साहन आणि अभ्यासासाठी अनुकूल वातावरण यामुळे त्याला आपल्या क्षमतांचा पूर्ण उपयोग करता आला.

## मुरूड–ताम्हिणीमार्गे लातूर एसटी बससेवेची मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड–ताम्हिणीमार्गे लातूर एस टी बस सेवा सुरु करावी या करिता पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तसेच स्थानिक आमदार महेंद्रशेठ दळवी व महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ मुंबई प्रादेशिक व्यवस्थापक यांचे निवेदन मुरुड आगार व्यवस्थापक राहुल शिंदे यांच्या कडे सुपूर्त करण्यात आले.

निवेदनात असे म्हटलं की मुरुड ताम्हिणी–स्वारगेट मार्ग लातुर ही एस टी बस सेवा मुरुड आगारातुन सुरू होती, परंतु काही कारणास्तव ह्या गाड्यांच्या फेऱ्या बंद करण्यात आल्याने. या मार्गी प्रवास करणारे विद्यार्थी, नोकरदार वर्ग व प्रवाशांचे अतोनात हाल होऊ लागले आहेत.


**पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा**
शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय
पता: नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र – ४००७०४
**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D KARANJA**
An Autonomous Body under Ministry of Education
Govt.of India
Address: Naval Armament Depot, Karanja, Uran Raigad, Maharashtra - 400704

| दूरभाष/Tele: 022 –27222132 | ईमेल/E-Mail :kvkaranja@gmail.com | KV CODE: 1205 |
|---|---|---|
| CBSE Affiliation No. 1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE: 27241501112 |

**प्रवेश सूचना (सत्र 2026–27)**

यह सूचित किया जाता है कि पीएम श्री केन्द्रीय विद्यालय, एनएडी करंजा, उरण रायगड में सत्र 2026–27 में कक्षा 5, कक्षा 10, कक्षा 11 (वाणिज्य संकाय), कक्षा 11 (मानविकी संकाय), कक्षा 12 (विज्ञान संकाय), कक्षा 12 (वाणिज्य संकाय) तथा कक्षा 12 (मानविकी संकाय) में कुछ स्थान रिक्त हैं। इन रिक्त सीटों को भरने हेतु ऑफलाइन पंजीकरण दिनांक 08.07.2026 को प्रातः 10:00 बजे से प्रारम्भ होगा तथा पंजीकरण की अंतिम तिथि 13.07.2026 को दोपहर 2:00 बजे तक निर्धारित है। "प्रवेश केन्द्रीय विद्यालय संगठन की प्रवेश मार्ग दर्शिका 2026–27 के अनुसार होगा। रिक्तियों की संख्या परिवर्तनीय है तथा केवल पंजीयन से प्रवेश का अधिकार सुनिश्चित नहीं है।"

इच्छुक अभिभावक आवेदन पत्र, विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in के अद्यतनीकरण/What's New में जाकर डाउनलोड कर, पूर्णतः भरे आवेदन के साथ समस्त आवश्यक दस्तावेज संलग्न कर विद्यालय में कार्य दिवसों में प्रातः 10:00 बजे से दोपहर 2:00 बजे तक जमा कर सकते हैं।

अपूर्ण, असत्य अथवा एक से अधिक आवेदन पाने पर पंजीकरण निरस्त कर दिया जाएगा तथा इस संबंध में कोई भी पत्राचार नहीं किया जाएगा।

**सही/–**
**प्राचार्य/Principal**
**पीएम श्री केन्द्रीय विद्यालय / PM SHRI Kendriya Vidyalay.**
**एन.ए.डी. करंजा/N.A.D. Karanja**
**उरण जिला–रायगढ़ (महाराष्ट्र) / Uran Dist-Raigad (MH**



## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे– गिरवले, ता–पनवेल, जि–रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**– मिळकतीचे वर्णन –**
**मौजेः गिरवले, तालुका– पनवेल, जिल्हा– रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर पॉ. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| गिरवले | १ पदु मारूती भोमकर<br>२ राघो मारूती भोमकर<br>३ विठ्ठल मारूती भोमकर<br>४ लक्ष्मी गणपत कोंडीलकर<br>५ प्रसन्ना धर्मा भगत<br>६ मंजुळा धोंडु गाताडे<br>७ रजनी राम गायकर<br>८ रविता राजेश म्हात्रे<br>९ सविता पुंडलिक माळी<br>१० सतीश जोमा गायकर<br>११ संदेश जोमा गायकर<br>रा. गिरवले, ता. पनवेल, जि. रायगड | ११ | ०.२०.०० जिरायत<br>०.०२.०० पो.ख<br>०.२२.०० हे.आर.पॉ.<br>पैकी<br>०.१८.०० हे.आर.पॉ | ३.३७ |
| | | एकूण | ०.१८.०० | |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०७/०७/२०२६**

सही/–
**अॅड. सरिता महेंद्र साखरे**
पत्ता– बंन्सल असोसिएट्स, पहिला मजला
प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं.४ नविन पनवेल,
बालाजी मंदिरच्या समोर ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६.

# 'एसआयआर'च्या यशस्वितेसाठी सोसायटी समन्वयकांची बैठक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आगामी निवडणूक प्रक्रियेचा कणा मानल्या जाणाऱ्या एसआयआर प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी सोसायटी समन्वयकांची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच वाशी येथील इम्पेरियल बँक्वेट हॉलमध्ये पार पडली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १८ चे नगरसेवक निशांत भगत आणि समाजसेवक संदीप भगत यांनी या बैठकीचे आयोजन केले होते.



मतदार यादी अद्ययावत करणे, पात्र मतदारांची नोंद सुनिश्चित करणे आणि अनधिकृत मतदारांवर नियंत्रण ठेवणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. बैठकीला मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि सोसायटी समन्वयक उपस्थित होते. यावेळी ठाणे-कोकण विभाग संवादक अभिजीत पेडणेकर यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. एसआयआर मॅपिंगचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता आणि विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. ती वेळेत आणि अचूकपणे पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी केले. बैठकीत बोलताना नगरसेवक निशांत भगत यांनी पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी विविध वॉर्डांमध्ये भेटी देऊन एसआयआर प्रक्रियेची पाहणी आणि आढावा घेत असल्याची माहिती दिली.

सध्या सुरू असलेल्या प्रक्रियेदरम्यान मॅपिंग पूर्ण न झाल्यास किंवा मतदार यादीत नाव समाविष्ट झाले नाही तर संबंधितांना पुन्हा संपूर्ण प्रक्रिया पार पाडावी लागू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच बूथ लेव्हल ऑफिसर म्हणजेच बीएलओ यांना घराघरापर्यंत पोहोचवून नागरिकांकडून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून घेणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले. बेलापूरच्या निवडणूक नोंदणी अधिकारी अश्विनी पाटील यांनी एसआयआर प्रक्रियेचे सविस्तर प्रशिक्षण दिले. मतदार म्हणून नोंदणीसाठी संबंधित व्यक्तीचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असणे आणि ती व्यक्ती संबंधित मतदारसंघातील रहिवासी असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मतदार नोंदणी, पडताळणी व मॅपिंग प्रक्रियेतील टप्प्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मतदार यादीतील त्रुटी दूर विश्वासार्ह मतदार यादी तयार करण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.

# नवी मुंबईत तीन दिवसांत तब्बल ४४२ मिमी पाऊस

## ६२ झाडे कोसळली, वाहतूक विस्कळीत

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरात सलग तिसऱ्या दिवशीही मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्याने दाणादाण उडवली आहे. ६ जुलै रोजी सकाळी ८.३० ते सायंकाळी ५.३०पर्यंत सरासरी ५३.४० मिमी पावसाची नोंद झाली आहे. यापूर्वी ४ जुलै सकाळी ८.३० ते ५ जुलै सकाळी ८.३० या कालावधीत २१०.७६ मिमी, तर ५ जुलै सकाळी ८.३० ते ६ जुलै सकाळी ८.३० पर्यंत १७८.६७ मिमी पावसाची नोंद झाली होती. पावसासोबत वाहणाऱ्या तीव्र वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात झाडांची पडझड झाली.

आपत्कालीन मध्यवर्ती नियंत्रण कक्षात दिवसभरात ठिकठिकाणी ६२ झाडे कोसळल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. या झाडांना मार्गातून हटवून वाहतूक सुरळीत करण्याचे काम अग्निशमन विभागाचे जवान आपत्कालीन विभागीय नियंत्रण कक्षाच्या सहकार्याने अथकपणे करत आहेत.



६ जुलै रोजी पहाटे ४.३८ वाजता ३.४४ मीटर उंचीची भरती नोंदवण्यात आली. नवी मुंबई शहर समुद्रसपाटीपासून खाली असल्याने भरतीच्या वेळी मुसळधार पाऊस झाल्यास सखल भागांत पाणी साचण्याची शक्यता असते. यासाठी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार आपत्कालीन मदतकार्य यंत्रणा क्षेत्रीय स्तरावर सज्ज ठेवण्यात आली आहे. महापौर सुजाता पाटील यांनीही शहरातील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी आणि अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन महापौर सुजाता पाटील आणि आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पालिकेने धोकादायक किंवा धोकादायक स्थितीतील इमारती तत्काळ रिकाम्या करून संभाव्य दुर्घटना टाळाव्यात, असेही आवाहन करण्यात आले आहे.

**विभागनिहाय पर्जन्यमापन**

- बेलापूर – ४३.३० मिमी
- नेरूळ – २९.२० मिमी
- वाशी – ४८.०० मिमी
- कोपरखैरणे – ६०.०० मिमी
- ऐरोली – ७३.८० मिमी
- दिघा – ६६.६० मिमी

# मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांचे नवी मुंबईत स्वागत

## प्रवासी उत्तराखंड संवाद संमेलन उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

उत्तराखंडचे यशस्वी व लोकप्रिय मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्या नवी मुंबई आगमनानिमित्त नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील, जिल्हा सचिव रविनाथ पाटील, नगरसेविका सरस्वती कथारा, कळंबोली मंडळाचे महासचिव दिलीप बिष्ट, उत्तराखंड समाजातील मान्यवर सदस्य तसेच उत्तराखंड प्रवासी परिषदेचे राज्यमंत्री पूरन सिंह नैनवाल आदी उपस्थित होते.



यानंतर वाशी येथे आयोजित प्रवासी उत्तराखंड संवाद संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात नवी मुंबईसह मुंबई महानगर परिसरातील मोठ्या संख्येने प्रवासी उत्तराखंडवासीयांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमात मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी उत्तराखंड राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी राबवण्यात येत असलेल्या विविध जनकल्याणकारी योजनांची माहिती दिली. रोजगारनिर्मिती, पर्यटन विकास, पायाभूत सुविधा, गुंतवणूक तसेच प्रवासी उत्तराखंडवासीयांच्या हितासाठी राज्य शासनाने हाती घेतलेल्या विविध उपक्रमांचा आढावा त्यांनी उपस्थितांसमोर मांडला. यावेळी त्यांनी प्रवासी उत्तराखंडवासीयांना आपल्या मातृभूमीच्या प्रगतीत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. उत्तराखंड सरकार आणि देशभरातील प्रवासी उत्तराखंडवासीय यांच्यातील संवाद अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने हे संमेलन महत्त्वपूर्ण ठरले. आत्मीयता, विश्वास आणि विकासाचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# वाशी सेक्टर ३०मधील रस्त्यांवर अवैध पार्किंगची समस्या

## भाजप सदस्य राजेश राय यांची कारवाईची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर-३० परिसरातील सार्वजनिक रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अवैध पार्किंग, कचरा वाहने आणि बांधकाम साहित्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. हा मुद्दा भाजपचे नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन समितीचे सदस्य राजेश राय यांनी उपस्थित करत उपायुक्त (महसूल) यांना लेखी निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, सेक्टर-३० परिसरात अनेक वर्षांपासून विविध कंपन्यांची कार्यालये आहेत. वाशी रेल्वे स्थानक ते सानपाडा रेल्वे स्थानकादरम्यानच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहने उभी केली जातात. तसेच रस्त्यालगत लोखंडी साहित्य, कपडे, ओंडके व इतर वस्तू टाकून अतिक्रमण करण्यात आले आहे. त्यामुळे परिसरात अस्वच्छता वाढत असून महापालिकेच्या स्वच्छता मोहिमेलाही अडथळा निर्माण होत आहे. याशिवाय सेक्टर-३० मधील एका खासगी कार्यालयात दररोज ट्रकद्वारे मालाची चढ-उतार केली जाते.

हायड्रॉलिक मशिनच्या साहाय्याने सुरू कामांमुळे वाहतुकीवर परिणाम होत आहे. राजेश राय यांनी सांगितले की, या परिसरात महापालिकेच्या बसेससाठी दोन बसथांबे असूनही अनेक वाहने तेथेच पार्क केली जातात. परिणामी प्रवाशांना बस पकडताना अडचणींचा सामना करावा लागतो. अवैध पार्किंगमुळे वाहतूक कोंडी वाढत असून अपघातांचा धोकादेखील निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित रस्त्यावरील अवैध पार्किंग, अतिक्रमण आणि रस्त्यावर उभी करण्यात आलेली वाहने हटवून वाहतूक सुरळीत करण्यासाठी महापालिकेने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी राजेश राय यांनी केली आहे.

# दत्तगुरूनगरात छतावरून पडून कामगाराचा मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर १५ येथील दत्तगुरूनगर सोसायटीमध्ये मंगळवारी (दि. ७) दुपारी भीषण अपघात घडला. बिल्डिंग नंबर ५८च्या छतावरील पत्र्यांवर प्लास्टिक टाकण्याचे काम करत असताना एक कामगार थेट खाली कोसळला. या अपघातात संबंधित कामगाराचा जागीच मृत्यू झाला.

इमारतीचे पत्रे खराब होते. पावसाचे पाणी गळत होते. मुसळधार पावसाने उसंत घेतल्याने डागडुजीची कामे सुरू होती. या इमारतीच्या पत्र्यांवर प्लास्टिक पेपर टाकण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार कामगार पत्र्यावर चढला होता, मात्र पत्रे जीर्ण असल्याने पत्रा तुटून कामगार थेट खाली पडला.

# आषाढी वारीत कोलिवूडच्या 'विठू'चा भक्तिमय गजर

## भक्तिगीत सोशल मीडियावर व्हायरल

**नवी मुंबई : बातमीदार**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वाचे औचित्य साधत कोलिवूडच्या माध्यमातून साकारलेले 'विठू' हे नवीन भक्तिगीत वारकरी आणि संगीतप्रेमींच्या भेटीला आले आहे. अल्पावधीतच या गाण्याने सोशल मीडियावर मोठी लोकप्रियता मिळवली आहे. विठ्ठलभक्तीचा गोडवा, वारीची ओढ आणि वारकरी संप्रदायाची आध्यात्मिक परंपरा यांचे सुरेख दर्शन या गीतातून घडते.




कोलिवूड निर्मित भक्तिगीताचे दिग्दर्शन प्रवीण कोळी व योगिता कोळी यांनी केले. गीत रेयांन वावरे यांनी गायले. गाण्यात आषाढीचा उत्साह, टाळ-मृदंगाचा निनाद व "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषाने वातावरण प्रभावीपणे उभारण्यात आले. या गीताला वारकरी, युवक आणि संगीतप्रेमींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गाण्यातील भक्तिभाव, आकर्षक चित्रीकरण व मनाला स्पर्श करणाऱ्या सादरीकरणामुळे हे गीत सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे.

# दिवाळे कोळीवाड्यातून स्वामी पादुका दिंडी आळंदी-पंढरपूरकडे मार्गस्थ

**नवी मुंबई : बातमीदार**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त माऊली ट्रस्ट, दादर (मुंबई) यांच्या वतीने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या श्री स्वामी समर्थ पादुका पायी दिंडीच्या प्रस्थान सोहळ्याला मंगळवारी (दि. ७) दिवाळे कोळीवाड्यातील साई मंदिर परिसरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला.



या सोहळ्याला पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री स्वामी समर्थांच्या पादुकांचे दर्शन घेतले आणि आशीर्वाद घेतला. "जय जय रघुवीर समर्थ", "श्री स्वामी समर्थ" आणि विठ्ठलनामाच्या अखंड जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. टाळ-मृदुंगाच्या गजरात, हरिनामाच्या अखंड गजरात आणि भक्तिभावाने ओथंबलेल्या वातावरणात श्री स्वामी समर्थांच्या पवित्र पादुकांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. फुलांनी सुशोभित केलेल्या पालखीत विराजमान पादुकांवर भाविकांनी पुष्पवृष्टी करत दर्शन घेतले. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भक्ती, आनंद आणि समाधानाचे भाव दिसत होते.

"सेवा, नामस्मरण आणि श्रद्धा हाच खरा अध्यात्माचा मार्ग" हा संदेश या पवित्र दिंडीतून भाविकांपर्यंत पोहोचला. श्री स्वामी समर्थांच्या कृपेने समाजात प्रेम, सद्भावना आणि सेवाभाव वृद्धिंगत व्हावा, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली. याप्रसंगी साई मंदिर द्वारकामाईचे संस्थापक व अध्यक्ष रमेशजी बोस यांच्या वतीने सर्व भाविकांसाठी महाप्रसाद आणि भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. उपस्थित भाविकांनी या सेवाकार्याचे मनापासून कौतुक करत आयोजकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. प्रस्थान सोहळ्यानंतर श्री स्वामी समर्थांच्या पादुका आळंदीकडे मार्गस्थ झाल्या.

तेथून आषाढीच्या पवित्र परंपरेत सहभागी होत पादुका पंढरपूरकडे पायी दिंडीने जाणार आहेत. प्रथमच आयोजित या दिंडीमुळे स्वामीभक्तांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण आहे. ही दिंडी भविष्यात भक्ती, सेवा आणि वारकरी परंपरेचा एक प्रेरणादायी धार्मिक सोहळा म्हणून ओळख निर्माण करेल, असा विश्वास उपस्थित भाविकांनी व्यक्त केला.

# पावसाच्या आगमनालाच बोंबील कडाडले!

## चढ्या दराने खवय्ये अवाक्

**उरण : प्रतिनिधी**

पावसाच्या सुरुवातीला येणाऱ्या बोंबील(बॉम्बे डक) या माशाचे बाजारात आगमन झाले आहे, मात्र मासेमारी बंदीमुळे आवक कमी असल्याने या माशाचा दर नगाला १०० रुपयांवर पोहचला आहे. हा दर पाहून खवय्ये आवक् झाले आहेत. यात आकारानुसार कमी दरांचेही बोंबील मिळत असले तरी गोरगरीब मांसाहारी खवय्यांचे अन्न म्हणून ओळख असलेल्या बोंबील माशाला पहिल्यांदाच चढे दर मोजावे लागत आहेत, मात्र याची आवक वाढल्यानंतर १० नगांचे ५० ते १०० रुपये दर होण्याची शक्यता आहे.





पावसाळ्यात मांसाहारी मंडळींकरिता बोंबील ही मेजवानी असते, मात्र गेल्या काही दिवसांपासून मासळी बाजारात या हंगामातील बोंबील अगदीच थोडय़ा प्रमाणात दाखल होऊ लागले आहेत. नगाला १०० ते ५० (आकारानुसार) रुपये अशी त्यांची विक्री होत असल्याने मासळीप्रेमी अवाक झाले आहेत.

बोंबील पावसाळ्यातच मोठय़ा प्रमाणात मिळत असल्याने त्याचा आस्वाद याच काळात घेतला जातो. ही मासळी कोकणी माणसाचे आवडते खाद्य. जून महिन्यापासून पावसाळी मासेमारीवर बंदी घालण्यात येते. त्यामुळे मासळीची आवक घटते. सध्या इतरही मासळी उपलब्ध नसल्याने नव्या हंगामात आलेल्या बोंबील माशांचे दर वाढलेले आहेत. गेल्या वर्षी याच कालावधीत बोंबलांचे दर एका नगाला ५० रुपये होते. ते यंदा दुप्पट झाल्याची माहिती मासळी खवय्ये नितीन पाटील यांनी दिली. हंगामातील पहिले बोंबील खाण्याची इच्छा असतानाही दरवाढीमुळे ते खाता येत नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

बोंबलाचा हंगाम नुकताच सुरू झाला. त्यांचे प्रमाण कमी असल्याने चढ्या दराने बोंबील खरेदी करावे लागतात आणि वाढीव दराने त्यांची विक्री करावी लागते. हळूहळू आवक वाढल्यानंतर बोंबील सर्वसामान्यांच्या आवाक्यात येतील.

# दमदार पावसामुळे बाजारात रानभाज्यांची आवक

**उरण : प्रतिनिधी**

पावसाचे आगमन यंदा उशिरा झाल्याने नागरिकांना नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या रानभाज्यांची प्रतीक्षा होती. गेल्या वर्षी मे महिन्यातच पाऊस सुरू झाल्याने रानभाज्या आणि कंद लवकरच बाजारात विक्रीसाठी आले होते, मात्र यावर्षी जून महिन्याची अखेर येऊनही पावसाच्या अभावामुळे रानभाज्या आलेल्या नव्हत्या, मात्र गेले काही दिवस पावसाने दमदार हजेरी लावल्याने रानभाज्या उगवत आहेत.



डोंगराळ आणि जंगलाने वेढलेल्या उरण तालुक्यातील गावांमध्ये अनेक दुर्मीळ आणि औषधी वनस्पती, फळे आणि रानभाज्या आढळतात. पावसाला सुरूवात होताच या भागातील आदिवासी जंगल, डोंगर आणि माळरानात आढळणारे करांदे, हळदे यासारखे कंद गोळा करून त्याची पनवेल, उरण येथील बाजारांत विक्री करू लागले आहेत.

विशेषकरून शेवळा, टाकळा, कंटोळी, कोरळा, कुर्डू यांसारख्या रानभाज्यांनी या भागातील बाजारपेठा भरून जात आहेत. चिरनेर, वेश्वी, रानसई, कोप्रोली, आवरे, पुनाडे, सारडे तसेच उरणजवळील द्रोणागिरी डोंगरात अशा भाज्या आणि कंद मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. दरवर्षी पावसाळ्यातच या रानभाज्या मिळत असल्याने खवय्येही या भाज्यांची खरेदी करीत आहेत. कोणतेही खत आणि कीटकनाशकांच्या वापराशिवाय मिळणाऱ्या या रानभाज्या २५ रुपये जुडी भावाने विकल्या जात आहेत.

# श्रीवर्धन शहरातील पथदिवे दिवसाही सुरूच!

## नगर परिषदेवर अतिरिक्त वीज बिलाचा बोजा



**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरामध्ये सीएसआर फंडामधून नवीन पथदिवे बसविण्यात आले. अगोदर सदरचे पथदिवे सौर उर्जेवर चालणार असल्याबाबत माहिती मिळाली होती.परंतु पथदिव्यांचे लोकार्पण झाल्यानंतर अद्याप पर्यंत तरी सदरचे दिवे कोणत्याही प्रकारच्या सौर उर्जेवर सुरू झालेले नाहीत. ते महावितरणच्या विजेवरतीच सुरू आहेत. सदर पथदिवे सुरू होण्यासाठी व बंद होण्यासाठी टायमर पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. परंतु अनेक वेळा दिवस उजाडून गेल्यानंतर देखील पथदिवे सुरू असल्याचे पाहायला मिळत होते. तर सायंकाळी अंधार झाल्यानंतर देखील हे पथदिवे पेटत नव्हते. याबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर नगरपरिषदेने सदरचे टाइमिंग बदलून घेतले आहे, परंतु मागील काही दिवसापासून हे पथदिवे दिवसा देखील अनेक वेळा सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. श्रीवर्धन नगर परिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे यांची पदोन्नतीवर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत उपायुक्त पदी बदली झाल्यानंतर श्रीवर्धन नगर परिषदेच्या प्रशासनाचा कारभार वाऱ्यावरच असल्याचे दिसत आहे. सदर नवीन बसविलेल्या पथदिव्यांमुळे नगरपरिषदेला वीज बिल देखील मोठ्या प्रमाणात येत आहे. त्यातच हे पथदिवे दिवसा सुरू राहिल्यामुळे नगरपरिषदेवर अतिरिक्त वीज बिलाचा बोजा पडत असल्याचे दिसून येत आहे. अनेक वेळा महावितरणचे वीज बिल थकल्याच्या घटना देखील घडलेल्या आहेत. श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाकडून अनेक नागरी सुविधांबाबत योग्य प्रकारे दखल घेतली जात नसल्याबद्दल नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

शहरात अनधिकृत बांधकामाचे व अतिक्रमणांचे प्रमाण देखील खूप मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. श्रीवर्धन बाजारपेठेत अनेक व्यापाऱ्यांनी गटारावरती आपली दुकाने सुरू केली असून, शटर देखील नगर परिषद रस्त्याच्या हद्दीत बसवण्यात आलेली आहेत. नगरपरिषद प्रशासनाने पथदिवे दिवसा सुरू राहणे, त्याचप्रमाणे अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यावरती तातडीने कारवाई करावी. अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# नागोठणे मीरानगर उड्डाणपुलाला भेगा; मोठ्या अपघाताची भीती

**नागोठणे : बातमीदार**

मुंबई–गोवा महामार्गावरील नागोठणे येथील मीरानगर उड्डाणपुलाची दयनीय अवस्था समोर आली असून उड्डाणपुलाच्या रस्त्याला मोठ मोठ्या भेगा पडल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

रस्त्याच्या मधोमध पडलेल्या खोल भेगांमध्ये वाहनांचे टायर अडकण्याची शक्यता निर्माण झाली असून, भविष्यात गंभीर अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

उड्डाणपुलावरील रस्त्याला स्लोप पडला असून अनेक ठिकाणी खड्डेही निर्माण झाले आहेत. पहिल्याच पावसात अशी परिस्थिती निर्माण होत असेल तर पुढील मुसळधार पावसात पुलाची अवस्था काय होईल, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

दरम्यान, रस्त्यावरील भेगांची माहिती मिळताच संबंधित ठेकेदार खडबडून जागा झाला. मंगळवारी सकाळी सुमारे ६ वाजल्यापासून कामगारांच्या मदतीने उड्डाणपुलावरील भेगा बुजविण्याचे तात्पुरते डागडुजीचे काम सुरू करण्यात आले.

नागोठणेचे माजी सरपंच विलास चौलकर हे दररोज सकाळी या उड्डाणपुलावर मॉर्निंग वॉकसाठी जात असतात. मंगळवारी सकाळी त्यांनी पुलावरील मोठमोठ्या भेगा पाहिल्यानंतर ही बाब पत्रकारांच्या निदर्शनास आणून दिली.

ठेकेदाराच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत चिंता व्यक्त करत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने पुलाची तांत्रिक तपासणी करून संपूर्ण उड्डाणपुलाचे दर्जेदार व कायमस्वरूपी पुनर्बांधणीचे काम करावे तसेच करण्यात आलेली तात्पुरती डागडुजी फार काळ टिकणार नाही. पुन्हा भेगा पडून प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो.



# अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेजमध्ये प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स येथे नुकताच प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ व सांस्कृतिक परिचय कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात आयोजित या कार्यक्रमास महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन जैनुद्दीन कादिरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली, तर



दिग्दर्शक किशोर शितोळे हे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक समिती व वरिष्ठ विद्यार्थ्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे मनापासून स्वागत करण्यात आले. वरिष्ठ विद्यार्थ्यांनी विविध मनोरंजनात्मक खेळ, सांस्कृतिक सादरीकरणे, भेटवस्तूंचे वितरण, अल्पोपहाराची व्यवस्था आणि सभागृहाची आकर्षक सजावट यांद्वारे नवगत विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि स्नेहपूर्ण वातावरण निर्माण केले.

यावेळी चेअरमन जैनुद्दीन कादिरी यांनी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करत त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक आणि वैयक्तिक भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी महाविद्यालयातील शैक्षणिक, सांस्कृतिक व सहशैक्षणिक उपक्रमांची सविस्तर माहिती देत विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासासाठी प्रोत्साहित केले. तसेच त्यांनी रॅगिंगविरोधी अभियानाबाबत मार्गदर्शन करून सुरक्षित, स्नेहपूर्ण आणि सकारात्मक वातावरणात शिक्षण घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमादरम्यान सांस्कृतिक समितीच्या वतीने वरिष्ठ विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक स्पर्धा, उपक्रम आणि सहभागाच्या संधींबाबत आपले अनुभव मांडत नवागत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्मा नाखुदा आणि मुस्कान मांडलेकर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, सांस्कृतिक समितीचे सदस्य आणि वरिष्ठ विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनाची सकारात्मक व आनंददायी सुरुवात करून देणारा हा स्वागत समारंभ संस्मरणीय ठरला.

# दापोली-महाबळेश्वर राष्ट्रीय महामार्गासाठी आमदार प्रवीण दरेकर यांचे केंद्रीय मंत्री गडकरींना साकडे

**पोलादपूर : प्रतिनिधी**

दापोली ते पोलादपूरमार्गे महाबळेश्वर या राष्ट्रीय महामार्गाला मंजुरी देण्याबाबत भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना निवेदनाद्वारे साकडे घातले. सोमवारी केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांनी यासंदर्भात निवेदन दिले.

आ. प्रवीण दरेकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना दिलेल्या निवेदनात, दापोली ते पोलादपूरमार्गे महाबळेश्वर हा महामार्ग कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. सध्याच्या दापोली महाबळेश्वर मार्गावर असलेला आंबेनळी घाट हा अतिशय वळणाचा आणि



संवेदनशील आहे. या घाटात दरडी कोसळणे आणि रस्ता खचणे यासारख्या समस्यांना सातत्याने तोंड द्यावे लागते. राज्य शासनाकडून रस्ता रुंदीकरण, कडेचे बांधकाम, धोकादायक वळणांवर भिंती बसविणे ही कामे केली जातात.

परंतु महाबळेश्वर आणि पोलादपूर पट्ट्यात मुसळधार पाऊस पडत असल्याने, दरड कोसळण्याच्या धोक्यामुळे सध्याचा रस्ता काही वेळा बंदही करावा लागतो. महाबळेश्वर देशातील महत्त्वाचे पर्यटन स्थळ आहे. तर दापोली आणि कोकण किनारपट्टीवर अतिशय स्वच्छ आणि सुंदर असे समुद्र किनारे, तीर्थक्षेत्र आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील विशेषतः सातारा, सांगली, कोल्हापूर या परिसरातून कोकणात येण्यासाठी आणि कोकणातील लोकांना पश्चिम महाराष्ट्रात जाण्यासाठी अधिक सुरक्षित व वेगवान महामार्गाची नितांत गरज असून दापोली ते पोलादपूरमार्गे महाबळेश्वर या राष्ट्रीय महामार्गाची उभारणी करावी, अशी मागणी होत आहे, असे नमूद केले आहे.

हा महामार्ग झाल्यास पर्यटनाला चालना मिळेल, प्रवास सुरक्षित व वेगवान होईल, कोकणातील आंबा, काजू इत्यादी उत्पादनांच्या वाहतुकीलाही मोठी गती मिळणार आहे. त्यामुळे दापोली ते पोलादपूरमार्गे महाबळेश्वर या राष्ट्रीय महामार्गाला आपण मंजुरी द्यावी व त्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद करावी, अशी विनंतीही आ. दरेकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना निवेदनाद्वारे केली. त्याला केंद्रीय मंत्री गडकरी यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला.

# पेणच्या मतदार यादी पुनःनिरीक्षण कामाचा जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडून आढावा

**पेण : प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाकडून विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनःनिरीक्षण कार्यक्रम घोषित झाला असून रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी प्रांत कार्यालय व पेण शहरातील यादी भाग क्रमांक १२३ ला भेट देऊन सुरू असलेल्या कामकाजाची पाहणी केली.



यावेळी संबंधित यादी भागाचे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, प्रशांत ढवळे यांच्या सुरू असलेल्या मतदारयादी पुननिरीक्षणाच्या कामाची जिल्हाधिकारी यांनी सविस्तर माहिती घेतली. मतदार नोंदणी, पडताळणी व पुननिरीक्षणाची प्रक्रिया तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांबाबत त्यांनी समाधान व्यक्त करत अधिकारी व कर्मचारी यांना आवश्यक मार्गदर्शन केले.

या भेटीदरम्यान प्रशांत ढवळे यांच्या कडून करण्यात येत असलेल्या कामाची जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी विशेष दखल घेत प्रशंसा केली. यामुळे मतदारयादी पुननिरीक्षणाच्या कामात कार्यरत अधिकारी व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना अधिक उत्साह मिळाला. याच कार्यक्रमात पेण शहरात पहिला फॉर्म श्री रामधरणे यांना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते देण्यात आला.

यावेळी प्रांतअधिकारी प्रवीण पवार तहसीलदार तानाजी शेजाळ नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, निवडणूक नायब तहसीलदार तुषार कामत पेण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी जीवन पाटील आदी उपस्थित होते पर्यवेक्षक प्रशांत ढवळे यांच्या सन्मानामुळे उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त करत मतदारयादी पुननिरीक्षण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

# रेवदंडा पंचक्रोशीत भात लावणीला वेग

**रेवदंडा : प्रतिनिधी**

कोकणात पावसाने समाधानकारक हजेरी लावल्यानंतर रेवदंडा पंचक्रोशीत भात लावणीच्या कामांना वेग आला आहे. चौल, बेलोशी, रामराजे, महाजने, वावे, खानावळ, वेळवली, चिंचोटी, वरंडे, देवघर, बोर्ली, वळके, रामराज, चोरढे, मिठेखार, काकळघर, भोईघर, आमली, महाळुंगे आदी गावांमध्ये शेतकरी वर्गाने भात लावणीला जोरदार सुरुवात केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे भातशेतीसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता झाली असून शेतांमध्ये रोपलावणीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. शेतकरी कुटुंबीयांसह महिला व मजुरांच्या सहभागातून सकाळपासून सायंकाळपर्यंत लावणीची लगबग पाहायला मिळत आहे.

यंदा पावसाने वेळेवर हजेरी लावल्याने भात पिकासाठी पोषक वातावरण निर्माण झाले असून चांगल्या उत्पादनाची अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. पावसाचा जोर कायम राहिल्यास पंचक्रोशीतील उर्वरित क्षेत्रातील भात लावणीची कामेही लवकर पूर्ण होतील, असा विश्वास शेतकरी व्यक्त करीत आहेत. सध्या गावागावांतील शिवार हिरवाईने नटू लागले असून पारंपरिक पद्धतीने सुरू असलेल्या भात लावणीमुळे ग्रामीण भागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कोकण मराठी साहित्य परिषद रायगडची वर्षासहल उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा रोहा तळा मुरुड यांचे संयुक्त विद्यमाने शनिवार व रविवार दि.४ व ५ जुलै रोजी तळा तालुक्यातील महुरे येथील स्मिहील फार्म हाऊस येथे साहित्यिक वर्षासहल अतिशय उत्साहात संपन्न झाली

या वर्षा सहलीमध्ये बहारदार कवी संमेलन,कराओके गायन,साहित्यिक खेळ व पोहण्याचा मनमुराद आनंद घेण्यात आला.या वर्षा सहलीमध्ये मुरुड,रोहा,पाली व तळा येथून २४ साहित्यिकांनी उस्फुर्त सहभाग घेतला.कवी संमेलनात पाऊस, जीवन,ईश्वर,नातीगोती,प्रेम,आभाळ अशा विविध विषयांवर कवींनी उत्तम रचना सादर केल्या.अध्यक्षस्थानी कोमसाप रायगड जिल्हा अध्यक्ष संजय गुंजाळ होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा समन्वयक रायगड भूषण सुखद राणे,नवी मुंबई महापालिका सहाय्यक आयुक्त शिक्षण विभाग दिपाली दिवेकर व पाली शाखा अध्यक्ष धनंजय गद्रे गुरुजी उपस्थित होते. कवी संमेलनाची जबाबदारी तळा शाखा, साहित्यिक खेळ मुरुड शाखा व कराओके गायन रोहा शाखेने उत्तम नियोजन केले.

सदर वर्षासहल यशस्वी करण्यासाठी कोमसाप रोहा शाखाध्यक्ष तळा शाखा अध्यक्ष संदीप जामकर,यांनी परिश्रम घेतले.



# लोणावळा, खंडाळा, गारळमाळ, राजमाची येथे पर्यटकांची तुफान गर्दी

**खोपोली : प्रतिनिधी**

पुणे आणि रायगड जिल्हात मुसळधार पाऊस पडत असून यामुळे तलाव, नदी नाले, धबधबे ओसंडून वाहत आहेत तर या पावसाचा आनंद घेण्यासाठी पुणे आणि मुंबईवरून पर्यटक मोठ्या प्रमाणात लोणावळा, खंडाळा आणि गारमाळला येत आहेत

थंड हवेचे ठिकाणी म्हणून लोणावळा आणि खंडाळा प्रसिद्ध असून लोणावळा येथील लायन्स पॉईंट, टायगर पॉईंड, भुशी डॅम, लोहगड किल्ला, टाटा डॅम,खंडाळा येथील राजामाची पॉईंड, अमृतांजन ब्रिज, राजामाची किल्ला, तर गारमाळ येथे नव्याने तयार करण्यात आलेला मिसिंग लिंक पाहण्यासाठी पर्यटक हे मोठ्या प्रमाणात दररोज गर्दी करत असल्याचे पाहायला मिळत आहे,



एकीकडे मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवर नव्याने तयार करण्यात आलेल्या मिसिंग लिंकमुळे कामगार वर्ग हा लोणावळा आणि खंडाळ्याचा बाहेरुन प्रवास करत आहेत तर हौसी पर्यटक हे जुन्या महामार्गाने येऊन लोणावळा खंडाळा येथे फिरण्यासाठी येत असून पावसात भिजून पर्यंटनाचा आनंद घेत आहेत शनिवार रविवारी सुट्या असल्याने हे पर्यटक मोठ्या प्रमाणात लोणावळा खंडाल्यातील प्रसिद्ध पॉईंट वर जाऊन पावसात भिजून धबधब्यांचा मनसोक्त आनंद आहेत, या पर्यंटांकामुळे येथील स्थानिकांच्या व्यवसायांवर चांगला परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

# स्पेनचा पोर्तुगालवर थरारक विजय

## रोनाल्डोचे विश्वविजेतेपदाचे स्वप्न अधुरेच!



**डॅलस : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकपच्या राउंड ऑफ १६ लढतीत इंज्युरी टाईममध्ये स्पेनचा बदली खेळाडू मिकेल मेरिनोने निर्णायक गोल झळकावला. त्याच्या या गोलच्या जोरावर स्पेनने पोर्तुगालवर १-० असा विजय मिळवत क्वार्टर फायनलमध्ये धडक मारली. या पराभवासह दोन दशके फुटबॉल विश्वावर अधिराज्य गाजवणाऱ्या ख्रिस्तियानो रोनाल्डोचे विश्वविजेता होण्याचे स्वप्न अखेर अधुरेच राहिले.

या सामन्यात पोर्तुगालच्या तुलनेत स्पेनने अधिक आक्रमक आणि दमदार खेळ केला, मात्र निर्धारित ९० मिनिटांत पोर्तुगालने कडवी झुंज देत गोलशून्य बरोबरी कायम राखली. अखेरच्या क्षणी स्पेनने खेळलेला दोन बदली खेळाडूंचा डाव सामन्याचा टर्निंग पॉइंट ठरला. ७१व्या मिनिटाला फेरान टोरेस मैदानात उतरला, तर ८५व्या मिनिटाला मिकेल मेरिनोला मैदानात उतरवण्यात आले.

जिथे लामिन यामालची जादू चालली नाही, तिथे फेरान टोरेस-मिकेल मेरिनो जोडीने आपली कमाल दाखवली. ९०+१व्या मिनिटाला फेरानने दिलेल्या अचूक पासवर मिकेलने विजयी गोल झळकावत स्पेनला १-० असा विजय मिळवून दिला. तत्पूर्वी स्पेनचा गोलरक्षक उनाई सिमोन पुन्हा एकदा भक्कम भिंत ठरला. त्याने संपूर्ण सामन्यात पोर्तुगालला एकही गोल करू दिला नाही. त्यामुळे स्पेनने सलग आणखी एका सामन्यात क्लीन शीट राखत क्वार्टर फायनलमध्ये धडक मारली.

स्पेनविरुद्धच्या सामन्यापूर्वीच ख्रिस्तियानो रोनाल्डोने हा विश्वचषक आपल्या कारकिर्दीतील शेवटचा असल्याचे स्पष्ट केले होते, मात्र हा सामना आपल्या कारकिर्दीतील अखेरचा ठरू नये, अशी इच्छाही 'आरसी७' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खेळाडूने व्यक्त केली होती, पण अखेर नियतीने वेगळाच निर्णय घेतला. पहिल्या हाफमध्ये रोनाल्डोने पोर्तुगालकडून सर्वात कमी अवघ्या १२ वेळा चेंडूला स्पर्श केला. दुसऱ्या हाफमध्ये त्याला गोल करण्याच्या काही संधी मिळाल्या, मात्र त्यांचे रूपांतर गोलमध्ये करण्यात तो अपयशी ठरला.

अखेर सहा विश्वचषक खेळूनही रोनाल्डोच्या हाती विश्वविजेतेपदाची ट्रॉफी लागली नाही. त्यामुळे सामन्यानंतर तो पूर्णपणे निःशब्द झाला. डोळ्यांतील अश्रू लपवण्याचाही त्याचा प्रयत्न अपुरा पडला. स्टेडियममधील पोर्तुगालच्या चाहत्यांच्याही डोळ्यांत अश्रू होते.

# बेल्जियमची उपांत्यपूर्व फेरीत धडक

## विश्वचषकातून अमेरिकेचे आव्हान संपुष्टात



**सिएटल : वृत्तसंस्था**

सिएटलच्या ल्युमेन फील्डवर झालेल्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत बेल्जियमने अमेरिकेचा ४-१ असा धुव्वा उडवत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. अमेरिकेच्या बचावातील ढिसाळपणाचा पुरेपूर फायदा घेत 'रेड डेव्हिल्स'ने ही महत्त्वपूर्ण लढत एकतर्फी जिंकली.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच बेल्जियमने आक्रमक पवित्रा घेतला होता. चार्ल्स डी केटेलेअरने शानदार कामगिरी करत दोन गोल नोंदवले, तर एक गोल करण्यासाठी साहाय्य केले. आठव्या मिनिटाला डी केटेलेअरने गोल करत बेल्जियमला आघाडी मिळवून दिली. ३१व्या मिनिटाला अमेरिकेच्या मलिक टिलमनने फ्री-किकवर गोल करून स्कोअर १-१ असा बरोबर केला, मात्र हा आनंद क्षणभंगुर ठरला. गोलनंतर अवघ्या ६१ सेकंदात अमेरिकेने गोल स्वीकारला. पुन्हा एकदा डी केटेलेअरने हेडरद्वारे गोल करत बेल्जियमला २-१ अशी आघाडी मिळवून दिली.

दुसऱ्या हाफमध्ये अमेरिकन गोलकीपर मॅट फ्रीजच्या चुकीचा फायदा घेत हान्स व्हॅनाकेनने बेल्जियमसाठी तिसरा गोल केला, तर स्टॉपेज टाइममध्ये रोमेलू लुकाकूने गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केले. या पराभवामुळे घरच्या मैदानावर जेतेपदाचे स्वप्न पाहणाऱ्या अमेरिकेच्या आशा मावळल्या आहेत. सामन्यादरम्यान अमेरिकेचा स्टार खेळाडू ख्रिश्चन पुलिसिक दुखापतीमुळे बाहेर पडल्याने संघाला मोठा फटका बसला. सलग सातव्यांदा बेल्जियमकडून पराभूत झाल्यामुळे अमेरिकन फुटबॉल चाहत्यांमध्ये निराशेचे वातावरण आहे.

# रामशेठ ठाकूर कॉलेजच्या नेहा राठोडची आंतरराष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड




**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील नेहा राठोड (टीवायबीकॉम) हिने उत्कृष्ट कामगिरी करत वेटलिफ्टिंग स्पर्धेत वेस्ट झोन टूर्नामेंट यामध्ये सुवर्णपदक पटकावले. या दमदार कामगिरीच्या जोरावर तिची आगामी व्हिएतनाम येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

नेहाच्या या यशामागे महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन, तर फिजिकल डायरेक्टर अजिंक्य भगत यांचे मार्गदर्शन लाभले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी नेहाचे अभिनंदन केले व पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# दासुन शनाकाची डबल हॅट्ट्रिक

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज आणि अष्टपैलू खेळाडू दसुन शनाकाने डबल हॅट्ट्रिक घेऊन इतिहास रचला. क्रिकेटच्या भाषेत जेव्हा एखादा गोलंदाज तीन चेंडूंमध्ये सलग तीन बळी घेतो, तेव्हा त्याला 'हॅट-ट्रिक' म्हणतात. पण जेव्हा एखादा गोलंदाज चार चेंडूंमध्ये सलग चार बळी घेतो, तेव्हा त्याला 'डबल हॅट-ट्रिक' म्हणतात. शनाकाने अमेरिकेत सध्या सुरू असलेल्या मेजर लीग क्रिकेटमध्ये सिएटल ऑर्कस संघाकडून खेळताना हा कारनामा केला.

स्पर्धेतील २१वा सामना पोमोना येथील नाइट रायडर्स क्रिकेट मैदानावर सिएटल ऑर्कस आणि टेक्सास सुपर किंग्स यांच्यात खेळला गेला. धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या सुपर किंग्स संघाला शेवटच्या षटकात विजयासाठी १५ धावांची गरज होती. शनाकाने सामन्याच्या शेवटच्या षटकात डबल हॅट्ट्रिक घेऊन आपल्या संघाला सामना जिंकवून दिला.

# झिम्बाब्वे दौऱ्यासाठी वैभव सूर्यवंशीला संधी

## ■ संजू सॅमसनला वगळले; रिंकू सिंगचे पुनरागमन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात होणाऱ्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघात यष्टिरक्षक फलंदाज संजू सॅमसनला संघातून वगळण्यात आले असून वैभव सूर्यवंशी आणि अभिषेक शर्मा यांना सलामीवीराच्या रुपात पहिली पसंती देण्यात आली आहे. श्रेयस अय्यरकडेच संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले असून तिलक वर्माची उपकर्णधारपदी कायम आहे.

संघात वैभव सूर्यवंशी आणि अभिषेक शर्मा यांना सलामीवीर म्हणून स्थान देण्यात आले आहे. ईशान किशन याच्याकडे प्रमुख यष्टिरक्षकाची जबाबदारी असेल. संजू सॅमसनला संघाबाहेर ठेवण्यात आले असून त्याच्या जागी यष्टिरक्षक-फलंदाज प्रभसिमरन सिंगचा समावेश करण्यात आला आहे.

आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यावर भारतीय संघाचा भाग असलेला अष्टपैलू खेळाडू सूर्यांश शेडगेला संघात संधी मिळाली असून रिंकू सिंग याचे पुनरागमन झाले आहे. शिवम दुबे, हर्ष दुबे आणि वरुण चक्रवर्ती यांनाही संघात स्थान देण्यात आले आहे.

वेगवान गोलंदाजांमध्ये अर्शदीप सिंग, हर्षित राणा आणि प्रसिद्ध कृष्णा यांना संघातून वगळण्यात आले आहे. त्यांच्या जागी युवा वेगवान गोलंदाज मयंक यादव, प्रिन्स यादव, यश ठाकूर आणि अशोक शर्मा यांना संधी देण्यात आली आहे. फिरकी गोलंदाजांमध्ये वरुण चक्रवर्तीला स्थान मिळाले असले, तरी कुलदीप यादवला पुन्हा एकदा संघाबाहेर ठेवण्यात आले आहे.

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील तीन सामन्यांची टी-२० मालिका २३ जुलैपासून सुरू होणार आहे. पहिला सामना २३ जुलै, दुसरा २५ जुलै आणि तिसरा २६ जुलै रोजी खेळवला जाणार आहे. तिन्ही सामने हरारे स्पोर्ट्स क्लब येथे भारतीय वेळेनुसार दुपारी ४.३० वाजता सुरू होतील.

संघ : श्रेयस अय्यर (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा (उपकर्णधार), ईशान किशन (यष्टिरक्षक), शिवम दुबे, सूर्यांश शेडगे, रिंकू सिंह, हर्ष दुबे, वरुण चक्रवर्ती, प्रिन्स यादव, यश ठाकूर, मयंक यादव, अशोक शर्मा, प्रभसिमरन सिंग (यष्टिरक्षक).

# भविष्याबाबत घाईघाईने निर्णय घेणार नाही -रोनाल्डो



**डॅलस : वृत्तसंस्था**

जागतिक फुटबॉलमधील महान खेळाडूंपैकी एक असलेल्या क्रिस्तियानो रोनाल्डोने आपल्या कारकिर्दीबाबत मोठी घोषणा केली आहे. २०२६चा फिफा विश्वचषक हा आपल्या कारकिर्दीतील शेवटचा विश्वचषक असेल, असे रोनाल्डोने स्पष्ट केले. स्पेनविरुद्धच्या महत्त्वपूर्ण 'राऊंड ऑफ १६' सामन्यापूर्वी आयोजित पत्रकार परिषदेत त्याने ही भावनिक घोषणा केली. दुर्दैवाने या सामन्यात पोतुर्गालची हार होऊन संघ विश्वचषक स्पर्धेबाहेर गेला. सहा विश्वचषक खेळूनही रोनाल्डोच्या हाती विश्वविजेतेपदाची ट्रॉफी लागली नाही.

दरम्यान, स्पेनविरुद्धच्या सामन्यानंतर बोलताना रोनाल्डोने मान्य केले की हा पराभव स्वीकारणे कठीण आहे, पण आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीच्या भविष्याबाबत आपण कोणताही घाईघाईने निर्णय घेणार नसल्याचे त्याने सांगितले. रोनाल्डो म्हणाला, विश्वचषकातून अशा प्रकारे बाहेर पडल्यामुळे मला दुःख झाले आहे. मी माझे सर्वोत्तम दिले आणि मी स्पष्ट मनाने बाहेर पडत आहे. होय, हा माझा शेवटचा विश्वचषक होता, पण आता मला विचार करण्यासाठी आणि माझ्या कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी वेळ मिळेल. मी भावनेच्या भरात कोणतेही निर्णय घेणार नाही.

# वेदांत नागवेकरची राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दमदार कामगिरी

## तीन सुवर्ण, एक रौप्यपदक जिंकले

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी गावचा सुपुत्र आणि सध्या मुंबईतील चांदिवली (अंधेरी परिसर) येथे वास्तव्यास असलेला १७ वर्षीय युवा पॉवरलिफ्टर वेदांत दिनेश नागवेकर याने राष्ट्रीय स्तरावरील डब्ल्यूआरपीएफ ओपन वेस्ट झोन पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये दमदार कामगिरी केली आहे. त्याने तीन सुवर्ण आणि एक रौप्यपदक पटकाविले.

मुंबईतील पवई येथे ४ व ५ जुलै रोजी महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन यांच्या आयोजनाखाली ही प्रतिष्ठेची स्पर्धा पार पडली. डब्ल्यूआरपीएफ इंटरनॅशनल चॅम्पियनशिपसाठी पात्रता मिळवून देणारी ही अधिकृत स्पर्धा असल्याने देशभरातील नामांकित आणि बलाढ्य खेळाडूंनी यात सहभाग घेतला होता. अशा कडव्या स्पर्धेत वेदांतने उत्कृष्ट कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.




६७.५ किलो सब-ज्युनिअर गटात सहभागी झालेल्या वेदांतने स्क्वॅटमध्ये १७५ किलो, बेंच प्रेसमध्ये ७५ किलो आणि डेडलिफ्टमध्ये २०० किलो असे एकूण ४५० किलो वजन उचलत दिमाखदार कामगिरी नोंदवली. क्रीडाप्रेमी आणि नागरिकांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




सौजन्य : प्रमिला पाटील (उपमहापौर, पनवेल महानगरपालिका)


# पहिल्या वनडेत झिम्बाब्वेची बांगलादेशवर मात



**हरारे : वृत्तसंस्था**

तीन वनडे मालिकेतील पहिल्याच सामन्यात यजमान झिम्बाब्वेच्या संघासमोर पाहुण्या बांगलादेशची फजिती झाली. पहिल्यांदा फलंदाजी करताना झिम्बाब्वेचा संघाचा डाव ३६.४ षटकांत १४१ धावांत आटोपला. बांगलादेश हा सामना अगदी सहज जिंकत मालिकेत आघाडी घेईल अशी परिस्थिती निर्माण झाली होती, पण झिम्बाब्वेच्या गोलंदाजांनी कमाल केली. त्यांनी बांगलादेशचा डाव ३३.१ षटकांत केवळ ११६ धावांत गुंडाळत संघाला २५ धावांनी विजय मिळवून दिला.

झिम्बाब्वेच्या संघाने १४१ धावांचा बचाव करताना २५ धावांनी सामना जिंकला. वनडेच्या इतिहासातील (डकवर्थ-लुईस किंवा कमी षटकांचा सामना वगळता) बांगलादेशविरुद्ध बचाव करण्यात आलेला हा सर्वात कमी धावसंख्येचा विक्रम ठरला. झिम्बाब्वेसाठी ब्रॅड इव्हान्स आणि कर्णधार रिचर्ड नगारवा यांनी प्रत्येकी तीन विकेट घेत विजयात मोलाचा वाटा उचलला, तर ब्लेसिंग मुजरबानी आणि न्यूमन न्यामहुरी यांनी प्रत्येकी दोन बळी टिपले.

नाणेफेक जिंकून बांगलादेशने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. फलंदाजीसाठी उतरलेल्या झिम्बाब्वेचा डाव १४१ धावांवर आटोपला. संघाकडून नवव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या न्यूमन न्यामहुरीने सर्वाधिक ३३ धावांची खेळी केली. त्याच्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही फलंदाजाला ३० धावांचा टप्पा गाठता आला नाही. बांगलादेशकडून नाहिद राणाने सर्वाधिक सहा विकेट घेतल्या.

१४२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशचा संपूर्ण डाव १२० धावांचाही टप्पा गाठू शकला नाही. संघाकडून नूरुल हसनने सर्वाधिक ३१ धावांची खेळी केली.

# युवा क्रिकेटपटूंसाठी झिम्बाब्वे दौरा ठरतोय स्वप्नपूर्ती!



**नवी दिल्ली** : भारतीय संघ या महिन्यात पुन्हा एकदा झिम्बाब्वे दौऱ्यावर जात आहे. या दौऱ्यात प्रभसिमरन सिंग, हर्ष दुबे, अशोक शर्मा, यश ठाकूर यांचे टी-२० पदार्पण होऊ शकते.

भारतीय संघाचे रनमशीन विराट कोहलीचे टी-२० पदार्पण अशाच एका झिम्बाब्वे दौऱ्यादरम्यान झाले होते. आपल्या फिरकीने भल्याभल्या फलंदाजांना बुचकळ्यात टाकणारे रविचंद्रन अश्विन आणि युझवेंद्र चहल यांच्या टी-२० कारकिर्दीची सुरुवात हरारे स्पोर्ट्स क्लब इथूनच झाली. भारतीय संघाचा तिन्ही प्रकारातला भरवशाचा फलंदाज केएल राहुलने वनडे कारकिर्दीची सुरुवात झिम्बाब्वे दौऱ्यातूनच केली. राहुलने पर्दापणाच्या लढतीतच शतकी खेळी साकारण्याचा विक्रम नावावर केला. २०२६ टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत मालिकावीराचा मानकरी ठरलेल्या संजूने टी-२० प्रकारात झिम्बाब्वेतच पहिले पाऊल ठेवले होते.

भारतीय संघाचा तारणहार अक्षर पटेलची सुरुवातही हरारेतूनच झाली आहे. कसोटीत टीम इंडियाची नवी वॉल असणाऱ्या चेतेश्वर पुजाराने वनडेत मापटे ओलांडले ते झिमाब्वे दौऱ्यातच. भारतीय संघात पुन्हा संधी मिळावी यासाठी परमेश्वराकडे धावा करणाऱ्या करुण नायरला पहिली संधी झिम्बाब्वे दौऱ्याद्वारेच मिळाली होती.




सौजन्य : राहुल वाहुळकर


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com